श्री

# शूरसेन.

अंक १ ते ३

[अकबरकालीन ऐतिहासिक गद्य नाटक]

(फक्त तीन तासांचा प्रयोग)

लेखक

श्री. पुरुषोत्तम पांडुरंग गोखले, बी. ए.

कोकिलहरी, झांकलें माणिक, देवी सुशील इ० पुस्तकांचा कर्ता, व संपादक - साहित्यसेवामंडळ

कऱ्हाड.

१९२८

# 'शूरसेना'ची तोंडओळख


| अंक | प्रवेशवारी | पृ० |
| --- | --- | --- |
| १ राजनिष्ठेचा फुलबाग :— (पानें २६) | १ शिकार | १ |
| | २ शृंगारसाज | ५ |
| | ३ दोन बायकांचा दादला | ८ |
| | ४ प्रतिज्ञा. | ११ |
| | ५ सवतीमत्सर | १६ |
| | ६ परजलेलें पाणी. | १९ |
| २ मेघडंबरी :— (पानें २५) | १ बहीणभाऊ | २७ |
| | २ तडजोड | ३२ |
| | ३ निर्वाणीचें उत्तर | ३७ |
| | ४ पलायन! | ४२ |
| | ५ रडकी कहाणी! | ४५ |
| | ६ वीज कडाडली! | ४८ |
| ३ दौलतजादा :— (पानें २९) | १ पश्चात्ताप | ५२ |
| | २ सेनानी समशेर | ५४ |
| | ३ राजदर्शन. | ६० |
| | ४ चेतावणी | ६४ |
| | ५ निर्वाणीची तयारी | ६८ |
| | ६ राजधोरण. | ७३ ते ८० |
| | | ८० |

श्री नटेश्वराय नमः

# राजनिष्ठेच्या फुलबाग.

स्थळ ] शिकार [अरवलीचें अरण्य

धीरसेन :- राणाजी, मी परतलों याचं कारण—

शूरसेन :- पुरे म्हणतां कां! स्पष्ट बोला.

धीर० :- या शिकारीपासून खांसाहेबांना स-
माधान व्हावं!—.

शूर० :- शिवशिव! खांसाहेबांच्या समाधाना
इतकीही किंमत तुमच्या स्वाभिमानाला
असूं नये कां! धीरसेनजी, तुमचा अभि-
मान कुठल्या दरींत धडपडला! कुबेरन-
गरीचे सेनापति धीरसेन, स्वाभिमानीसौ-
दामिनीचे सासरे धीरसेन, एकलिंगजीं-
चे एकनिष्ठ भक्त धीरसेन, आज मेंढरांच्या
मवाळपणानें कसे मेले! राणाजी, हा-
तून सुटलेल्या शिकारीची दरकार नाहीं!
भुवईच्या लवण्यासरशीं, शेकडों वन-
सम्राटांकुम्भांच्या गोळीनें पायांत गोंडा
घोळायला लावण्याच्या हिंमत रजपूतम-
नगटांत आहे. पण धीरसेनजी, ती शि-
कार म्हणजे तुमचा अभिमान होता—हिं-
दूच्या कलिजगारीची ती नौबत होती.

धीर० :- शूरसेन, कोणताही हिंदु आपल्या-
स्वाभिमानाला प्राणाच्या मोलानें मोजतो!

शूर० :- मग शिकार सोडलीत ती खानाच्या
नखाची सर नाहीं या भावनेनें!

धीर० :- कोण म्हणतो! तुर्कांच्या-मुसलमा-
नांच्या बरोबरीनें आम्हां हिंदूंचा मान
आणि माणुसकी आहेत, ही भावना य-
धीरसेनाच्या अंतःकरणांत सूर्यप्रकाशा-
सारखी लेवले. पण शूरसेन, मी ती शि-
कार मोठ्या खुषीनें आणि अभिमाना-
सम्राटसत्तेला आदर

शूर०:— धीरसेनजी, काय काळकूट ओकलांत हें! परक्या सम्राटसत्तेवर मोर्चेलें ढाळण्यांत रजपुतांना खुषीचा स्वाभिमान वाटावा ना! राणाजी, गुलामगिरीचा गळफास कुबेरनगरीला कंठाच वाटत असेल नाहीं!

धीर०:— राजनिष्ठा ह्मणजे गुलामगिरी वाटते! शूरसेन, शब्दांच्या साखरझोपेनें बेहोष होऊं नका. अल्लडपणांतला आडदांडपणा ओलांडून अनुभवाच्या आखाड्यांत आल्यावर देखील तुह्मांला कळूं नये, कीं राजनिष्ठा ह्मणजे स्वाभिमानाच्या मानेवर ठेवलेली सुरी नव्हे. उभा आर्यावर्त आज मोंगलांची सत्ता कबूल करीत आहे ना? मग, जितक्या एकनिष्ठेनें महाराज पृथ्वीराज चव्हाणांच्या रजपूत तख्तापुढें आपल्या पूर्वजांनीं माना वांकवल्या, तितक्याच एकनिष्ठेनें आपल्या चक्रवर्तीसत्तेपुढें आपण आपल्या माना नकोत कां वांकवायला! बाळा शूरसेना, राजनिष्ठा हें हिंदूचें शील आहे. त्या शीलाला स्मरूनच मी आपली शिकार खांसाहेबांना सादर केली.

शूर०:— असल्या बाह्यात जेमान्या निखाऱ्यांनींच राजस्थानची होळी झाली! धीरसेनजी, "नाविष्णुः पृथिवीपतिः" ह्मणून संबोधले जाणारे तुह्मी राजे, खाविंदापायीं खेटराकिंमतीचे कंगाल ठरलांत तरीसुद्धां कसलीही खंत वाटत नाहीं ना!

धीर०:— राणाजी, या राजस्थानच्या

राण्यांनीं वैभव-संन्यास घेतला असला तरी अजून सत्व-संन्यास केला नाहीं!

शूर०:- त्याच्यासाठीं नवस करायला नको!

धीर०:- एक वेळ नाहीं, पण शंभर वेळ नाहीं. राजनिष्ठेसाठीं, स्वामीसेवेसाठीं, आभिमानानें आम्ही आपल्या हाडांचे हिमालय उभारूं, पण सत्वाच्या संरक्षणासाठीं साऱ्या ब्रह्मांडाच्या मांड मोडून टाकायला ही एका पायावर तयार होऊं.

(पडद्यांत वाघ गुरगुरतो)

शूर०:- हेंच खरें असेल, तर आपण बांधलेली ही सम्राटसत्तेची पूजा आपल्या पायांनीं चालून येत आहे, तिला हसागत करा —

धीर०:- हें हिंदूंचें ब्रीद नव्हे.

शूर०:- स्वाभिमानाला अर्धचंद्र देणें हें तरी हिंदूंचें शील आहे वाटतें! धीरसेन, हिंदूंच्या स्वाभिमानासाठीं तुमच्या बहकलेल्या राजनिष्ठेवर ही पहा, हा शूरसेन तिरंदाजी करतो आहे. (वाघ पडतो) बस्स! ही शिकार माझी झाली.

दिल्लीरखान (प्र० क०):- कुणाची झाली?

शूर०:- माझी झाली.

दिल्ली०:- तुझी! - तू कोण?

शूर०:- मी कोण! चक्काचूर झालेल्या चितोडच्या गादीवरील वीरसेनाचा भाऊ शूरसेन.

दिल्ली०:- त्या शूरसेनानें या आमच्या पाठीवर रेघोट्या मारल्या?

शूर०:- अजून रजपूत मनगटांतली [illegible] मुर्देफरास झाली नाहीं [illegible] माझी शिकार मीं [illegible]

दिलीर :- तुला या ठिकाणीं शिकारीचा
आधीकार कोणी दिला?
शूर० :- परमेश्वरानें दिला. अरवलीचा
डोंगर म्हणजे राजस्थानचा शिर-पेंच.
आम्हां रजपूतांच्या बापजाद्यांचीच
ती मत्ता नाहीं कां?
दिलीर० :- पण आमची सत्ता आहे ना?
शूर० :- आमच्या मनावर?
दिलीर० :- आमचें मन लागेल त्यावेळीं
मनावर देखील!
शूर० :- घ्या, धीरसेनजी, सम्राटस-
त्तेचा आहेर घ्या.
दिलीर० :- कोण, धीरसेन! राजनिष्ठ
मेघसिंहाचे चुलते धीरसेन! सला-
म राणाजी, सलाम! राणाजी, सम्राट
अकबराच्या, अकबराच्या या प्रतिनि-
धीचा अपमान उच्छृंखल वृत्तीच्या
पोरांनीं करूं नये असें तुमच्या अस्सल
राजनिष्ठेला वाटत असेल, तर शूरसे-
नाला शिकार माझ्या स्वाधीन करा-
यला सांगा.
धीर० :- शूरसेन, राजनिष्ठेकरतां प्रसंग
पडला तर माझ्या साऱ्या देशबांधवां-
च्या मानेवर नंगी समशेर धरीन, पण
पाठीमागून त्याच माझ्या देशबांधवासाठीं
हृदयांतल्या रक्ताचें कारंजें फोडीन.
शूरसेन या म्हाताऱ्या रजपूताच्या वा-
णीवर विश्वास ठेवून दिलीरखानांला
नसलें तरी या रजपूत रक्ताच्या धीरसे-
नाला आपली शिकार द्या, एवढीच विनंति
आहे. शूरसेन ती अमान्य करूं नका.
शूर० :- घ्या, धीरसेन घ्या ती शिकार.

वडिलकीच्या मान सात्विक वृत्तीनें ठेवलाच पाहिजे! माझ्या सौदामिनीताईचे चुलत सासरे धीरसेन, ताईप्रमाणें मलाही वडिलांच्याच ठिकाणीं आहेत. धीरसेनजी, नाहीं मला बोलवत, घ्या ती शिकार — जातों मी. (जातो)

धीरसेन:- खानसाहेब, पुण्याच्या पिकानें पैदा केलेली शिकार आपल्या करवीं मी सम्राटसत्तेला अर्पण करतों.

दिलदार:- अल्ला तुमचें कल्याण करो!
(लोक शिकार घेऊन जातात.)

धीर०:- भगवान् एकलिंगजी, वृद्धापकाळच्या बुद्धिभ्रंशामुळें माझ्या हातून कांहीं चूक होत असेल, तर त्याची कडु फळें कुबेरनगरीच्या गादीला भोगायला लावूं नका, एवढेंच ह्यातारपणीं या धीरसेनाचें आपल्या चरणीं मागणें आहे.

# शृंगारसाज

(स्थळः—महाल)

सौदामिनीः—हो, हो! अस्संच! स्वारीहून स्वारी आली कीं, साफ सांगणार.

मेघसिंह (प्रवेश करून):—काय, काय सांगणार!···आमचं तोंड सुरूं झाल्याबरोबर आपलं तोंड बंद कां बरं? तोंडाला तोंड दिल्याशिवाय शृंगारसाज सार्थ कसा होणार! राणीसाहेब, रमणीच्या तोंडचीं मुक्ताफळं······

सौ०:—मानसीच्या राजहंसांनीं वेचायचीं असतात.

मे०:—मग तें भाग्य आमचं नाहीं तर?

सौ०:—कसली दारुण नि अभद्र शंका ही? इच्छा कधीं मनाला सोडून राहील का?

मे०:—मग ती सुंदर काव्यासारखी न सांगतांच समजायची, वाटतं?

सौ०:—रसिकपणाची बहार त्यांतच असते. कितीही सफाईनं पदर उकलले तरी ज्यांतलं सौंदर्य सरलं नाहीं त्यालाच काव्य म्हणतात.

मे०:—जगांतलं तसलं एकच काव्य म्हणजे तुझं हृदय आहे खरं! त्याचा गूढ संकेत मला कळायचा नाहीं का?

सौ०:—हृदयाच्या तारा एकवटल्या असल्यावर न कळायला काय झालें? ओळखायचाच गडे! ओळखायचा हं!!

मे०:—सौदामिनी बिनशर्त शरण येतों वाटलं तर! पण तुला काय पाहिजे तें तुझ्या बिंबाधरांतून स्रवूं दे.

सौ०:—काय म्हणजे? विजयी वीरांना दसऱ्या दिवशीं ओवाळतांना आम्हां रजपूत स्त्रियांना स्वर्ग खुला होत असतो. विजयानंदाच्या स्वाभिमानी स्मितांची गोड चांदरात झडत असतांनाच सादर प्रेमाच्या हिरेमोल हारांनीं जीविताच्या देवाची पूजा बांधण्यांत वीरांगनांना धन्यता वाटत असते. त्या धन्यतेचा हा हार आपल्याला हवा ना? मग या पाजळलेल्या पंचारतींत रणप्रसादाची विजयी माला ओवाळणी म्हणून घातल्याशिवाय—उँ! हूँ!!

मे०:—रणप्रसादाची विजयी माला? राणीसरकार, आतां आम्हांला दसरा म्हणजे परांगदा झालेल्या पराक्रमाचं प्रतिमापूजन होऊन बसला आहे. रण-

प्रसादाची आमची विजयी माला आम्ही सम्राटसत्तेला राजीखुषीनं वाहिली! जाऊं दे, दिलबहार, तुझ्या-सारख्या सौभाग्यलक्ष्मीला ओवाळणी तरी कोणती घालूं?

सौ०:-कोणती म्हणजे? हें कसलं विचारणं? आपल्या अत्यंत प्रिय वस्तूची.

मे०:-सौदामिनी, रणप्रसादाची विजयी माला दुर्लभ सल्याकारणानं आपल्याकडून अधिकारानं ओवाळून घ्यायची माझ्या हृदयाला खंत वाटते! राणीसरकार, माफ करा.

सौ०:— असं कष्टी कां बरं व्हायचं महाराज? पुरुषार्थाचा पराक्रम पांगळा पडला तरी समाधींतली सिद्धी कांहीं कमी कर्तबगार नसते. प्रत्यक्ष विजयश्रीनं जिच्यापुढं हात जोडावे, ती आपल्या पूर्वजांची ही समशेर मला आज ओवाळणी म्हणून घालायला-काय बरं हरकत आहे ? पार्वतीदेवीसाठीं शंकरांनीं ओसाड अरण्याचं देखील नंदनवन—

मे०:— राजलक्ष्मी, आपली इच्छा देखील आपल्या तेजस्वी चरित्राला साजेशीच आहे.... पण हें काय, सौदामिनी हें काय? हा अपशकून तर नाहीं?

सौ०:— नाहीं. हें पाहिलं कां हा माझा चुडा फुटला नाहीं. तो जशाचा तस्सा गळून पडला. या विजयादशमीच्या मुहूर्तानं आपल्यासारख्या रणछोड-दासांचं स्वागत करतांना या सौदामिनीच्या हातून आर्यभूमीला चुडेदान मिळालं!

मे०:-- किती गोड कल्पना ही!! लाडके, कवडी कुवतीच्या कंगाल हृदयांनीं अपशकुनांच्या आचरट कल्पनांना अर्धचंद्र देण्याचं धाडस केलं आणि धीमेपणानं तुमच्यासारखं कोणत्याही गोष्टी-कडं गुणशोधक नजरेनं बघायची संवय केली तर काय बहार हो ? बरं, घे ही ओवाळणी.

(समशेर सौदामिनीचे कमरेस लटकावतो.) आतां शोभतेस खरी माझी पद्मिनी!

सौ०:-- आणि माझ्या हातांतली ही माला?

मे०:-- ती त्या रणदेवतेलाच समर्पण असो. सौदामिनी, किती गोड सुवास हा! तुझं स्वर्गीय प्रेम तर या सुगंधाच्या रूपानं या मालेंतून दरवळत नाहीं! राणीसरकार, प्रेमस्वरूप पुष्पांची ही माला आपल्या पूर्वजांच्या रणदेवतेला वाहतांना तुमच्या मस्तकावर महिषासुरमर्दिनीचे आशीर्वाद वर्षत आहेत; त्यांच्या बळावर राजस्थानची रणमर्दाई आपण पुन्हां प्रस्थापित करा, एवढीच माझी आपणाला प्रेमाची प्रार्थना आहे.

# दोन बायकांचा दादला

(स्थळ – रस्ता)

—:०:—

बदामी:– एकदां झालं, दोनदां झालं, अशीच्या अशी बाईसाहेबांच्याकडं जातें अन् पाहतें गमजा !

खारिकसिंग:– काय बिजली कडकडली पण ! हें बघ ए बदामी, असं काय करावं बरं ? वाटलं तर मी तुझ्यापुढं गुडघे मोडतों, पण हा राग–

ब०:– आग झालीय माझ्या अंगाची ! घरादाराची राहुटी करायची वेळ आणलीत तरी बाष्कळपणानं बडबडायला लाज नाहीं वाटत ?

खा०:– आशापूर्ण देवी की जय ! लाजेचा रंग गुलाबी असतो. म्हणूनच. लाजेची अन् बायकांची गांठ देवानं कायमची बांधून ठेवली आहे. ती गुंडाळून ठेवून तू आपली जीभ अशी मोकळी सोडलीस त्याला काय म्हणायचं ?

ब०:– काय म्हणजे ? आपले कान लांबलेत एवढंच म्हणायचं ! नवऱ्याचे कान फार लांबू लागले म्हणजे त्यांना बेताचे करायला लग्नाच्या बायकोची जीभ वळवळत सुटते, समजलांत ?

खा०:– सगळ्याच वाळवंटांत कांहीं पाणी लागत नाहीं !!

ब०:– डोळ्यांतून तरी निघतं ना ?

खा०:– म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं, –कोणाचा होऊं नये बदला, कोणाचा होऊं नये दादला ! ( तिच्या पायां पडतो )

बेदाणी ( प्रवेशून स्वगत ) :– काय प्रेमळ स्वभाव हा ! कोण तें ? सुंदरलाल !

खा०:– ... बापरे ! कोण बेदाणी ! सोरटी सोमनाथसारखा एकदम भंगून कां नाहीं गेलों ? बेदाणी, सुंदरलाल कुठला काढलास ? हा मी तुझा खारिकसिंग नाहीं कां ? अँ ! हें बघ ए........

बे०:– मला नाहीं वाटलं खारिकसिंग असा बायकोला नमस्कार घालतील असं !

खा०:– तुला अगदीं आतांच यायला फावलं ! राणी संयोगितेच्या छंदानं पृथ्वीराज विलासी झाला असतां अचूक स्वारी करणारा शाबुद्दीन घोरी तुझ्यांत संचारला कीं काय ?

बे०:– कां एवढा कसला घोर लागलाय ?

ब०:– मुके झालेत मुके !

खा०:– बेदाणी हिच्या फाजील प्रेमामुळं त्यांचा तोठरा बसलाय माझ्या घशांत.

बे०:– बदामी, इतका तोंडाळपणा नवऱ्याशीं चांगला नाहीं हो ! असला लाल तुला मिळाला हें तुझं नशीबच समज !

ब०:– म्हणून तर माझे असे तडे पडायची वेळ आलीय !

बे०:– मग मी करूं कां कांहीं गोळा ?

ब०:– ( स्वगत ) देवीची आरती नी पुजारणीची भरती !

खा०:– कशाला ? एका चंडीचे पाय धरतां धरतां मला पुरेवाट होतीय, त्यांत ही आणखी महाकाली कशाला ?

बे०:– एकूण, बाईसाहेबांच्या पुढची ही गरीब गाय एरवी बरीच लाथरी आहे तर !

खा०:– त्याला कारण– प्रेम.

ब०:– नाहीं. यांचेच गुण.

बे०:– असे यांनीं उधळलेत तरी काय ?

खा०:– अग, कांहीं नाहीं. हिचा एक होता कंठा–होता भिकारच.– तो देऊन हें आदिमाता, जगन्माता,–देवी चंडिका तिचं तीर्थ आणलं !

ब०:– तीर्थ म्हणे तीर्थ. हें तीर्थ होय ? यापेक्षां एकाद्या बाळंत्यांतल्या पोराचं कां नाहीं घेत ?

बे०:– अग बाई ! ही तर दारू.

बु०:– सांग, आतां काय करूं ? यांचे पाय धरूं ?

खा०:– मीच तुझे धरले धरतो.

बे०– अहाहा ! जीव ओंवाळून टाकावासा वाटतो अगदीं. बदामी, तुला कंठाच पाहिजे ना ? मी देतें हवा तर ? पण तू यांना एक शब्द बोलतां कामा नये.

ब०:– त्यांनीं फिरून तसलं तीर्थ घेतां कामा नये.

बे०:– त्याची जिम्मा माझ्याकडं लागली.

खा०:– बेदाणी, आज तू मला अगदीं अकबरबादशहा भेटलीस.

ब०:– परक्या बायकोशीं असंच वागायचं कां ?

बे०:– बदामी, मी कुणी परकी कां आहे ?

खा०:– हं ! बंघ म्हणजे झालं !

ब०:– नशीब माझं !

बे०:– इश्श ! हें ग काय ? चल सुकाळ्यानं वाड्यांत.

ब०:– नाहीं तर प्रेम चव्हाट्यावर येईल !

खा०:– त्याची लज्जत आतांशी मला कळूं लागली आहे.– चला. ( जातात )

---

रस्ता की ...

बे०:- कां एवढा कसला घोर लागलाय?
ब०:- मुके झालेत मुके!
खा०:- बेदाणी, हिच्या फाजील प्रेमामुळं त्यांचा तोठरा बसलाय माझ्या घरांत!
बे०:- बदाभी, इतका तोंडाळपणा नव-ऱ्याशीं चांगला नाहीं हो! असला लाल तुला मिळाला हें तुझं नशीबच समज!
ब०:- म्हणून तर माझे असे लाडे पडायची वेळ आलीय कांचेसारखी!
बे०:- मग मी करूं कां कांहीं गोळा?
ब०:-(स्व०):- देवीची आरती अन् पुजारणीची भरती!
खा०:- कशाला? एका चंडीचे पाय धरतां धरतां पुरेवाट होतीय, त्यांत ही आणखी महाकाली कशाला?
बे०:- एकूण, बाईसाहेबांच्या पुढची ही गरीब गाय एरवीं बरीच लाथरी आहे तर!
खा:- त्याला कारण — प्रेम!
ब०:- नाहीं, यांचेच गुण!
बे०:- असे यांनीं उधळलेत तरी काय?
खा०:- अग, कांहीं नाहीं! हिचा एक कंठा — होता भिकारच! — तो देऊन हें आदिमाता-जगन्माता-देवी चंडिका तिचें तीर्थ आणलें!
ब०:- तीर्थ म्हणे तीर्थ! हें तीर्थ होय? यापेक्षां एखाद्या बाळुत्यांतल्या मुलाचं तरी घेत जा.
बे०:- अगबाई! ही तर दारु!!
ब०:- सांग, आतां काय करूं? यांचे पाय धरूं?
खा०:- मींच तुझे धरतों.
बे०:- अहाहा! जीव ओवाळून टाकावासा वाटतो अगदीं! बदाभी तुला कंठाच

पाहिजे ना! मी देतें हवा तर! पण तूं यांना एक शब्द बोलतां कामा नयेस!

ब०:- त्यांनीं फिरून तसलं तोंड घेलां कामा नये.

बे०:- त्याची जिभ्भा माझ्याकडं लागली!

खा०:- बेदाणी, आज तू मला अगदीं अकबर बादशहाच भेटलीस!

ब०:- परक्या बायकोशीं असंच वागायचं कां!

बे०:- बदामी, मी कुणी परकी कां आहे?

खा०:- हं! बघ म्हणजे झालं!

ब०:- नशीब माझं!

बे०:- इश्श! हें ग काय? चल मुकाट्यानं वाड्यांत!

ब०:- नाहींतर प्रेम चव्हाट्यावर येईल!

खा०:- त्याची लज्जत आलांशीं मलाकळूं लागली आहे — चला. (जातात)

→ स्थळ ] प्रतिज्ञा [ रंगमहाल ←

सौदामिनी:— (कमरेची तलवार सोडित असते तोंच)

मेघसिंह (प्रवेशून) :- हां! हां! सुकुमार, त्या देवतेचा असा कां बरें उपमर्द करावयाचा? विजयी समशेरीला अशा त्यागानें वाईट नाहीं कां वाटणार? (ती तलवार बांधते) वा! किती उदात्त आणि मनोरम दृश्य दिसते म्हणून सांगू! सूर्यकिरणांनीं चमकावलेल्या मेघडंबरीला बिजलीची लखपती किनार शोभते, तसा देखावा आतां मला या महालांत दिसतो आहे. हो! आपल्याप्रमाणेंच ती मूर्तिमंत सौदामिनी आहे. कोमलतेनें आपण तिच्यावर मात कराल, पण चपलतेंत ती आपल्याला हार जायची नाहीं बरें! (हसून) अहाहा! प्रेहा!स्था

समोरच्या आरशांत आपलें बिंब नीट निरखून पहा! शृंगारसाजाच्या प्रेमळ भरतीनं थयथयणारी आपली कोमल काया या समरसाजानं सोज्वळ सजली आहे. छे! लाजेच्या नजरेचा तो अमृतवर्षाव पायांशीं लोळण घेणाऱ्या जमीनीलाच तेवढा मिळावा असा प्रेमशास्त्रांतला कांहीं ध्रुवसिध्दांत नाहीं!

सौ०:— आपल्या या मनोरम मूर्तिखेरीज सौदामिनीला दुसरा ध्रुवच ठाऊक नाहीं, तर आपल्यावचनाशिवाय तिला सिध्दांत तरी कसा कळणार? म्हटलं —

मे०:- मग कांहीं म्हणूंच नका! या माझ्या डोळ्याला डोळा द्या आणि त्यांतल्या विद्युत्तेजानें माझ्या हृदयाचा ठाव काढा. अशा मागें कां बरें घेतां? तो पहा, तो पहा, सरस्वतीसारखं भारदस्त पाऊल पडल्याकारणानं क्षणाक्षणाच्या अंतरानें उमटणारा शांत पण मंजुळ छुमछुमाट, त्या रणगाजी समशेरीच्या कोमल खळखळाटांत कसा कुजबुजत्या गतीनं विरत जात आहे! राणीसरकार एवढ्यांतच कसली अस्वस्थता ही? प्रेमाच्या फुलबागेंतला हा उंबरता फुलोरा कीं लढाऊ लेंगरांनीं उंचावलेला क्षात्रवृत्तिचा मनोरा?

सौ०:- प्रत्यक्षाच्या पडलाळा पार फसला बरं स्वारीचा! नवाईनं नट-

विलेली मनाची ओशाळली धांदल--

मे०:- होणें अगदीं स्वभावसिध्द आहे. मद-
नाच्या या मंदिरांत, हृदयाला बहिरून
टाकणाऱ्या, अमृतवर्षाव करणाऱ्या डोळ्यां-
च्या दरवाजानें बाहेर पडून, निसुरत्या
नरशार्दुलासुध्दां अंधळे बनविणाऱ्या
तेजाचा अवतार झाला पाहिजे! सभर
शृंगारानें शृंगारसम्राज्ञीला भूषविल्या
कारणानें, दिलदार हृदयाच्या महासागर,
गंगायमुनांना घरंगळून देणारा आणि
गौरीशंकराला डोक्यावर घेणारा हिमा-
लय बनला पाहिजे! दिलवर, --

सौ०:- ओशाळलेल्या जीवाला अवघड
उपदेशानं असं लाजवूं नये गडे! गा-
ईच्या गरीब हृदयाला वाघिणीच्या क्रूर
नजरेची जोड मला एकाएकी कशी
देतां येणार? शूरसेनांच्या संगतीनं
रणांगणावरचे मर्दानी खेळ खेळल्या-
ला आतां किती दिवस लोटले! मध्यं-
तरी विवाहाच्या वेदिकेवर विहार करून
प्रेमपरागांच्या पुष्करणींत आपल्यासवें
मी न्हात असतां माझ्या मनाची मर्दा-
नी मांडणी मवाळली होती, तिला
आज या सभरशृंगारानें टवटवी मि-
ळतांच वृत्ति थोडी बावरली तर आ-
श्चर्य कसलें?

मे०:- मनाच्या या साहजिक सौंदर्यांतच
जगांतील वेड लावणाऱ्या आश्चर्यांचें
आश्चर्य सांठवलें आहे. या बावरले-
ल्या मुखभंडलावर विधात्यानें विखु-
रलेल्या नक्षत्रमालेच्या नाचे पाहून

सुखाच्या शेवट सुध्दां निराश मनाच्या शून्य सृष्टींत हालीं रहात नसल्यामुळें प्रेमाच्या पावन प्रकाश देखील बावळा बनलो. किंचित् काळ सूर्यानें सोडलेल्या चंद्राची कृष्ण कळा पाहून धीरगंभीर म्हणून गाजलेला समुद्रही आपला ऊर बडवून घेऊं लागतो. नाथ, आपल्या मनाची आतां तशी भेदरट अवस्था झाली आहे. कपाळीं कुंकू कोरायची कला तेवढी बायकांना माहीत असते त्याच्या तजेला राखणें पुरुषांच्या पराक्रमावर अवलंबून असतें. जातीवंत रक्ताला शकुनापशकुन भीत असतात. मेंदूच्या नी हृदयाच्या गोपाळकाला करून भाग्याचा मुरलीधर प्रसन्न करतां येतो. नाथ, धांदरलेल्या कल्पनेला हा अनुभविक सिध्दांत चोखाळतां आला नाहीं, तरी हाडींमासीं खिळलेली धीरवृत्ति नशिबाला नमस्कार कधींच करीत नाहीं; आणि म्हणूनच या राजस्थानच्या इतिहास म्हणजे मर्दाईचें मानससरोवर आहे. नाथ, अजून आपलें मन नाहीं शांत होत! कुरुक्षेत्राच्या रणमैदानावर राणाजी पृथ्वीराजांच्या पुण्याई साठीं देवी संयोगिता महिषासुरमर्दिनी बनल्या होत्या! काळाची करडी नजर होऊन त्यानें मोहरा केलाच, तर त्याची आयाळ धरून त्यावर स्वारी भरण्यासाठीं देवी संयोगितेप्रमाणेंच या समशेरीचं मी सौभाग्य चालवीन; आणि तें नच घडलें तर देहीं खेळणाऱ्या जातीवंत रक्तानं तिचं कपाळ साजरं करीन.

साठीं अधीर झालेल्या या माझ्या दृष्टीला, उभारलेल्या हातांच्या धूमकेतूंनीं बाध आणूं नका. वा! वा! वा! अस्मानच्या साऱ्या तारकापुंजांची मांडणी आपल्या निर्मल दंतपक्तीच्या हर्षांत झाली आहे! डोळ्यांच्या मंगल मंजुषेंत शुक्रशुक्रांची जोडी सामावली आहे, केशकलापाच्या उदरीं शनि आला आहे, आणि आरक्त मंगळ हा या चंद्रकोर कुंकुमतिलकांत — पण काय पहातों हें मी? मातृसंतोषासाठीं पित्राज्ञा प्रमाण मानणाऱ्या श्रीरामचंद्राला सिंहासनाची पायरी चढतां चढतां वनवास पत्करावा लागला! तेंच दारुण सत्य आज इथंही प्रत्ययाला आलें! सौदामिनी, तुझ्या हातांच्या धूमकेतूंनीं तुझ्या कपाळींच्या कुंकुम-मंगळाला विदारून टाकलें! लाडके, उन्मादाच्या ऐनेमहालांत आलेला हा अपशकून तुझ्या-माझ्या मनोरथांच्या मोत्यांना मेघांचे अश्रू तर ठरविणार नाहीं ना!

सौ०:— महाराज, असं भविष्याच्या भयाला भिऊन कसें चालेल? ओठाबाहेर तें पोटाबाहेर! प्रत्यक्ष विधात्याला तरी तें कुठलें टाळतां येणार?

मे०:— राणीसरकार, मला कळून चुकलें कीं या कुबेर नगरीचें रवंबायती आरवातें आलां लवकरच कच्छचें रण होणार! आजच्या या अशुभानें माझा उत्साह कसा उखडून निघाला!

सौ०:— नाथ, अशी कां बरं बुध्दी बधीर होऊन जायची? निराशेचा काळोख गेलेला क्षण शेवटच्या सुखाचा होता असं भासवतो.

मे०:- कुबेर नगरीच्या कालीमाते, सर्व प्रजाजनांचा प्रतिनिधी म्हणून मी तुला अभिवादन करतों!

---

स्थळ ] सवती-सत्कार [ रस्ता

बेदाणी:- मलासुध्दां तिचें भय वाटलं! परवां पिस्तेरबानाशीं लढाई झाली तेव्हां लढतांना ती किती भयंकर दिसत होती म्हणतां! एक एक डोळा म्हणजे आग्र्याच्या यमुनेमधला मासाच!

खारीक:- त्याचा अनुभव मला आहे. एकदां कां तिनें डोळे वटारले कीं देवकीच्या साळंच्या गर्भासारखा मी जिथल्या तिथें चूर होतो.

बे०:- नुसता चंडिकेचा अवतार दिसते ती तशा वेळीं! --

खा०:- हूं! काय करायचं!! जिथं राणी-सरकारांच्याच अंगांत आतांशा महिषासुर-मर्दिनी संचारली आहे तिथं बाकीच्या दासीनीं चंडिकाचामुंडा नको कां व्हायला? एकटी तूच कशी नंदिनी राहिलीस बेदाणी?

बदामी (एकदम प्रवेशून) कोण? बेदाणी! वा-हवा ग! शहाणी!!

खा०:- सोरटीसोमनाथासारखा धक्का बसला माझ्या टाळक्यांत! भगवान् एकलिंगजी, तुला जर कांहीं माझी दया येत असेल, तर ही कोसळणारी वीज रागाच्या सपाट्यानं ताडून डोळे मिटूं दे! बरं आहे, बेदाणी, येतों म्हटलं!

बे०:- चाललांत कुठं चोरून? तुम्ही दोघेही आज माझे गुन्हेगार आहांत!

खारीक :- खाविंद, कसूर माफ! बेदाणी, चुडेदान मागून घे, चुडेदान मागून घे.

बदामी :- काय ग बेदाणी, मी नसतांना माझ्या घरांत कां आली होतीस?

खा० :- खारीकसिंग बेदाणीच्या प्रेमांत गुरफटल्यामुळें बदामी, एखादा पापामिया गाठून दिल्लीला गेली कीं काय हें बघायला! होय ना बेदाणी?

बे० :- घर आहे यांचं!

ब० :- यांच्या काकांचं!!

खा० :- कुणाचंच नाहीं! ज्याचं होतें तो गेला कैलासाला अन बेदाणी तू आतां खु-
श...

ब० :- ... नीं खाल्ले

# सवती – मत्सर

बेदाणीः-- मलासुद्धां तिचं भय वाटतं! परवां पिस्ते-खानाशीं लढाई झाली तेव्हां लढतांना ती किती भयंकर दिसत होती म्हणतां! एकेक डोळा म्हणजे आग्र्याच्या यमुनेमधला मासाच!

खारिकसिंगः— त्याचा अनुभव मला आहे. एकदां कां तिनं डोळे वटारले कीं देवकीच्या सातव्या गर्भासारखा मी जिथल्यातिथं चूर होतों.

बे०:-- नुसता चंडिकेचा अवतार दिसते ती तशा वेळीं —

खा०:— हूं! काय करायचं!! जिथं राणीसरकारांच्याच अंगांत आतांशा महिषासुरमर्दिनी संचारली आहे, तिथं बाकीच्या दासींनीं चंडिका – चामुंडा नको कां व्हायला? एकटी तूंच कशी नंदिनी राहिलीस बेदाणी?

बदामीः— ( एकदम प्रवेशून ) :— कोण? बेदाणी? वाहवा ग वाहवा शहाणी!

खा०:— सोरटी सोमनाथासारखा धक्का बसला माझ्या टाळक्यांत! भगवान् एकलिंगजी, तुला जर माझी कांहीं दया येत असेल, तर ही कोसळणारी वीज रागाच्या सपाट्यानं ताटून डोळे मिटूं दे. बरं आहे, बेदाणी, येतों म्हटलं मी.

ब०:— चाललात कुठं चोरून? तुम्ही दोघेही माझे गुन्हेगार आहांत.

खा०:— खाविंद, कसूर माफ! बेदाणी, चुडेदान मागून घे.

ब०:— काय ग बेदाणी, मी नसतांना माझ्या घरांत कां आली होतीस?

खा०-— खारिकसिंग बेदाणीच्या प्रेमांत गुरफटल्यामुळं एकादा पापामिया गांठून बदामी दिल्लीला गेली कीं काय हें बघायचं होतं तिला. होय ना बेदाणी?

बे०:-- घर आहे यांचं !

ब०:-- यांच्या काकांचं !

खा०:-- पूर्वीं होतं. आतां कुणाचंच नाहीं. कारण ते सावकाराकडं "घाण" आहे. घर खरं ज्याचं होतं तो गेला कैलासाला, अन् बेदाणी तूं आतां खुशाल येत जा विलासोला.

ब०:-- माझे हात कांहीं कोल्ह्यांनीं खाल्ले नाहींत समजलांत !

खा०:— बदोमी, प्रातीचा अर्धा वांटा माझा...

बे०:-- कारण, मी त्यांची अर्धांगी आहें.

ब०:-- काय हो, माझा असा गळा कापायचा होता तर माझ्याशीं आधीं लग्न तरी कशाला केलेंत ?

खा०:— सणंग इतकं जाडंभरडं निघेल याची मला काय कल्पना ?

बे०:— आधीं घ्यायचं डोक्यावर मग द्यायचं मोक्यावर !

खा०:-- भगवान् महादेवांनीं लावलेलं वळण !!

ब०:— मग पार्वतीसारखी भिल्लीण होऊन धरूं कां गिरकीचा घेर भोंवतालीं ? मग तरी वागाल कां जरा मनासारखें ?

खा०:— मैनेसारखं तुझं मन असतं कीं नाहीं म्हणजे ही मनधरणी जमली असती !

ब०:— अंगाचा कसा तिळपापड होतो ! असल्या या मिळमिळीत सौभाग्यापेक्षां धडधडीत वैधव्य काय वाईट ?

बे०:— तुझ्या सौभाग्याची तूंच कांहीं एकटी मालकीण नाहींस. तूं अशी वाघिणीसारखी उठलीस तरी या माझ्या सौभाग्याला अस्सं पाठिशीं घालायला ही मी समर्थ आहें समजलीस !

ब०:— बेदाणी, रजपूत म्हणवून घेतांना तुझ्यासारख्या स्त्रीइतका मर्दपणा जरी अंगीं असता, तरी माझ्या बाइल-बुद्धीनं यांच्या पराक्रमाचे दिवे पाजळले असते. सम्राट् सत्तेशीं निष्ठेनं वागणाऱ्या मेघसिंहमहाराजांवरसुद्धां राजबंदी व्हायची पाळी आली तर आपली काय कथा ? घर फिरलं म्हणजे वासे—( रडूं लागते )

खा० ( रडत ):— पानी तेरा रंग कैसा ? जिसमे मिलावे वैसा.

बे०:— मग तुझं रडगाणं तरी काय ?

ब०:— वेळ नाहीं, वखत नाहीं; पण काळ आहे त्याचा काय नेम सांगावा ? तेव्हां तुम्ही दोघांनीं माझ्या-पासून लढाईचं शिक्षण घेतलं पाहिजे.

बे०:— लढाई ? अगऽ बाऽऽई !!

खा०:— खासा न्याय ! राणीवशांत दशरथासारखा तुझ्या पाठीमागं दडल्यावर माझं रक्षण करण्याकरतां तूं कैकयी व्हायचं टाकून तूंच "अगऽ बाऽऽई" करीत बसणार वाटतं ? अग, मग आपल्या पोटीं रामावतार कसा होणार ? शिवाय, लढाईचं शिक्षण घ्यायचं अवघड काय आहे ? हें बघ, मी या क्षणीं लढून दाखवतों.

ब०:— असे बायकोच्या नथेंतून तीर मारणारे वीर दमडीला दहा हजार मिळतात !

खा०:-- अग, पण त्यांत दिखील शिताफी पाहिजे. नाहींतर नथेसुद्धां नाकच तुटून जायचं ! चल, चल, आहे तुझी मागणी कबूल. ही रडतराणी आम्हांला आतां घोड्यावर बसवणार आहे ! बेदाणी, अशी घाबरूं नको. जयचंद राठोडाकडचा तुझा माझा हा लग्नसमारंभच आहे !

बे०:-- अस्सं कां ? चला तर या तुमच्या लाडक्या देवीच्या मंदिरांत स्वस्थपणानं. ( जातात )

बे०:- असे बायकोच्या नथेंतून तीर मारणारे
वीर दभडीला दहाहजार मिळतात!

रवा०:- अग पण त्यांतसुध्दां शिताफी पाहिजे.
नाहींतर नथेसुध्दां नाकच तुटून जायचं!
चल, आहे तुझी मागणी कबूल-चल! ही
रउतराणी आम्हांला आतां घोड्यावर
बसवणार आहे! बेदाणी, अशी घाबरं नको,
जयचंद राठोडाकडच्या -- तुझा माझा हा
लग्न समारंभच आहे!

बे०:- अस्सं कां? चला तर, देवीच्या मंदिरांत!
(जातात.)

---

स्थळ] परजलेलें पाणी. [ अरवलीचें जंगल

धीरसेन:- या मावळत्या सूर्यनारायणाकडे पाहिलं
कीं कुबेरनगरीचा सूर्यास्तच डोळ्यांपुढें
दिसूं लागतो! बाळ मेघसिंहाला नाहींसा
होऊन उणे पुरे तीन महिने झाले! -- पण
अद्याप ती गोष्ट कालच झालीशी वाटते,
गेलें तें अटकेपार उडून गेलें म्हणून
डोळेझांक केली आणि विचारी मनानें
सद्यःस्थितीकडे नजर रोखली तर --?
हल्लीं या राजस्थानांत स्वधर्माकरितां
मोंगलाशीं झुंजायला तयार झालेल्या रज-
पूत नरसिंहांच्या विचार करूं लागलें कीं
एकदम चित्तवृत्तींत खळबळ उडून श-
त्रूला हात घालावासा वाटतो!

शूरसेन (प्र.):- होय, राणाजी, आतां तेंच केलें
पाहिजे. निष्ठुर काळाच्या यापेक्षां किती
अंत पाहणार?

धी०:- म्हणजे काय शूर?

शू०:- म्हणजे काय? राणाजी, बोला, आपण
आणखी किती दिवस हे शिकारीचे बाव-
कर खेळ खेळत बसणार?

या शिकारीनें तुमच्या अंगांत नवीन रवरवरवीतपणाचा संचार होण्याऐवजीं तुमची जातीवंत तेजस्विता जर दिवसेदिवस कमी होऊं लागली तर या शिकारीचा काय उपयोग? क्षित्रियांच्या रणांगणावर पराक्रमाची शिकस्त करून बारा डोळे वटारणाऱ्या सूर्याच्या रसरशीत तेजालासुध्दां लाजेनें काळवंडायला लावणारे राणाजी संग, रजपुतांच्या नारिंगी निशाणाला दिगंतरीं गाजविणारे चव्हाण—आज आपल्या जातकुळीवर, अव्वल दर्जाच्या क्षात्रियत्वावर लाथ मारून नादानपणानें शिकारींत मजा मारूं लागले, असाच कीं नांवलौकिक तुम्हीं रजपुतांच्या कपाळीं कायमचा कोरून ठेवणार आहां? बोला, राणाजी, बोला!

धी०:- शूर, तुला झालं तरी काय? उदयसिंगजींनीं तुझ्यावर जादू तर नाहीं केली?

शू०:- होय, केली! आणि तीच जादू तुमच्यावर करण्याकरतां मी आलों आहे. बोला, रणसंग्रामांत उडी घेणार कीं शिकार करीत बसणार?

धी०:- शूर, शांतपणानेंच कोणत्याही गोष्टीचा विचार करण्याची वृध्दांची रीत असते. जरा पोक्तपणानेंच तूही या गोष्टीचा विचार कर! राजस्थानच्या या उतारकाळांत शस्त्र उचलण्यापेक्षां—शस्त्र उचलून स्वामिद्रोहाचा अरवली डोक्यावर गडगडून घेण्यापेक्षां राजनिष्ठ राहून आपल्याला स्वतःचं हित जितकें साधतां येईल तितकें दुसरें कशानेंही येणार नाहीं!

शू०:- राणाजी, योक्त विचार कसला करायचा तेंच मला कळत नाहीं! स्वार्थी सूडासाठीं स्वदेशावर निखारे ठेवणाऱ्या जयचंदापासून म्लेंच्छापायीं रजपुतांनीं आपलें रक्त आर्यभूमीवर थोडें कां सांडलें? पण आज तुमच्या धर्माची शेंडी परधर्माच्या दाढींत गुंतूं लागली, तुम्हां रजपुतांचे शरीरसंबंध राजमान्य परकीयांशीं घडून तुमच्या कुलस्त्रियांच्या पावित्र्याला पाय फुटले आणि संस्कृती नामशेष व्हायच्या मार्गाला लागली तरीसुध्दां तुम्हीं मुक्तकंठानें राजनिष्ठेचे पोवाडे गावेत? खरोखर विचार धन्य आहे तुमची! आणि तुमच्या राजनिष्ठेची!! प्रत्यक्ष तुमची कुबेरनगरी पारतंत्र्याच्या पचनीं पडूं लागली तरी तुमचे डोळे उघडूं नयेत ना?

धी०:- कुबेरनगरी सदैव राजनिष्ठच राहील! स्वतांच्या अभ्युदयापेक्षां आपल्या स्वर्गीय दानलीला यत्किंचितही धक्का लागूं नये म्हणून रजपूत आपलें रक्त कुठेंही सांडायला तयार होतात, असेंच कुबेरनगरी आपल्या शीलानें सगळ्या जाहीर करील. शूरसेन, कुबेरनगरी परतंत्र असली तरी मांडलिकी पुरती! आमच्या अंतर्गत कारभारांत तर मोंगलांनीं हात घातला नाहीं ना? शेवटच्या संग्रामांत आम्ही आपलें रक्त त्यांच्याकरतां राजनिष्ठेनें ओतलें हें पाहतांच ते आमच्याशीं प्रेमानें वागूं लागले!

शू०:- भोळ्याभाबड्या मना, हें सारें मृगजळ आहे. सम्राटसत्तेशीं मुळतें घ्याल तोंवर

प्रजेनें तुमच्या हुकमाला मान तुकवा-यची आणि ज्यादिवशीं तसें न जमेल त्यादिवशीं सम्राटसत्तेचा शिरस्ता शिर-सावंद्य झाला पाहिजे — या अंकित निर्भेळ स्वातंत्र्याला, कुजल्या डावांतील कमकुवत मनाशिवाय दुसरीकडे पूजा नाहीं. राणाजी, जडीबुट्टीच्या बुध्दिवादानें मोंगलांनीं टाकलेलें हें एक मोहनास्त्र आहे! त्याच्या जोरावर, उद्या येईल त्या दिवशीं तुम्हांला तुमच्या सिंहासनावरून खालीं खेचून —

धी०:- ज्या क्षणीं तसा प्रसंग येईल त्या क्षणीं कुबेरनगरीच्या निरकमठ्यावर तीर चढविला जाईल. शूरसेन, लक्षांत असूं द्या-या मनगटांतील रक्त अस्सल रजपूताचें आहे.

शू०:- त्याच रक्ताच्या स्वाभिमानी उसळी-करितां आज सारा राजस्थान आशेनें डोळे लावून बसला आहे. राणाजी, बोला आपण रणसंग्रामांत सिंहाच्या ध्वजाला साजेशी उडी घ्यायला तयार आहांत कां? अवघा राजस्थान आपल्या एका शब्दावर जीव टांगून बसला आहे. त्याची निराशा करून, रजपूत रक्ताच्या परंपरागत स्वाभिमानाला बट्टा लावून संस्कृतीद्रोहाचें पातक माथीं घेणार कीं —

धी०:- पण शूर, सम्राट अकबराच्या प्रजा-हितदक्षतेनें आणि वात्सल्यानें सर्व राज-स्थान शांतिमय सुखाच्या उपवनांत आनं-दानें विहार करायला राजी दिसत असतां धर्मयुध्दाचें भलतें वेड पिकवून प्रलय मांडण्यांत कसला पुरुषार्थ?

शू०:- समाजाच्या नेतेपणाची ज्यांच्यावर जबाबदारी असल्या आपल्यासारख्या कर्त्या पुरुषांनींच असले नामुष्कीचे उद्गार काढल्यावर यमुनेच्या डोहांतील कालियावरील भगवान् श्रीकृष्णाप्रमाणेंच, पारतंत्र्यावर मात करणारा रजपूतांचा जीवंत स्वाभिमानही निजधामाला गेला म्हणावयाचा! शब्दांच्या शराबपाण्यानें समाज धुंद झाला तर त्याला शुध्दीवर आणायचें सोडून, नेते जर स्वतःच धुंद होऊन जाऊं लागले तर त्या समाजाच्या सत्यानासाला सुरवात झाली असेंच म्हटलें पाहिजे! शांतिमय सुखाच्या मृगजलामागें लागलेल्या आपल्या वेड्या देशबांधवांना पारतंत्र्याचें जड जोखड झुगारुन देण्याकरतां नेत्यांनीं तयार करायला नको कां? मांडीवर मान ठेवून निधास्त राहणाऱ्या आपल्या प्रजेला वडिलांच्या वात्सल्यानें मार्गाला लावणें हें राजाचें आद्य कर्तव्य आहे. राणाजी, आपण तर राजांचे काका आहां! त्या आपल्या ईश्वरदत्त प्रतिष्ठेला कालिमा तरी फासा किंवा धर्माच्या पालनासाठीं तिरंदाजीला तरी तयार व्हा.

धी०:- शूरे, तू मला वाघसिंहांच्या शिकारी पविञ्यांत धरलेंस! आतां मी करूं तरी काय?

शू०:- हा प्रश्न या अरवलीवरच्या ओहोळांना विचारा. राजस्थानची रडकथा हा अरवली ओहोळांच्या अश्रूंनीं आपल्यापुढें ओतलो आहे. राणाजी, ओहोळांच्या लोकरूण रक्तवर्ण मावळत्या सूर्याच्या किरणांनीं बनला नसून, पानिपतच्या रणमैदानावर देशाच्या चिंधड्या उडाल्या-

मुळें पृथ्वीराजांच्या पुण्याईच्या जो रक्तपाट वाहिला त्याची लाली या अरवलीच्या अश्रूंना आली आहे. पानिपतच्या रणांगणावर खरपलेलें हें उसळलें रक्त, राणाजी, पुण्यश्लोक पूर्वजांच्या पायांची शपथ घालून सवाल टाकीत आहे कीं राजस्थानची कांहीं लाज तुम्हांला आहे कां? राजस्थानच्या स्वतंत्र संसाराकरितां स्वतांच्या संसारावर निखारे ठेवायची तुमची धाती आहे कां? अरेरे! क्षत्रियकुलावतंस राणा संगांनीं ज्या रजपुतांच्या पराक्रमाचा डंका अलभ दुनियेंत गाजवला त्याच चितोडच्या गादीशीं माझा आज नांवापुरता जरी मालक म्हणून संबंध राहतां तर वाटेल तसली भीष्मप्रतिज्ञा करून जीवाच्या करारावर ती शेवटास नेली असती आणि राजस्थान स्वतंत्र केला असता! पण शून्यांतून सृष्टी उभारण्याचा चंद्रगुप्ताचा पराक्रम स्वतांच चाणक्य होऊन मला करण्याची वेळ आहे. पण त्याला तरी हरकत कसली? धीरसेनजी, ही पहा माझ्या राजस्थानाकरितां ही माझ्या सर्वस्वावर लाथ मारली! राणाजी, सम्राटसत्तेशीं राजनिष्ठ राहणारे राजे आतांपासून माझे शत्रू झाले. जा, राणाजी, आपल्या राजनिष्ठेच्या जोरावर माझ्याशीं सामना द्यायला तयार व्हा.

धी०:- हें युध्दाचें आव्हान मी क्षत्रियाच्या स्वाभिमानानें स्वीकारतों. सम्राटसत्तेशीं राजनिष्ठ असेंपर्यंत

शूरसेन, आपल्याशींच काय, पण साऱ्या जगाशींही सामना द्यायला हा धीरसेन तयार आहे. आमच्या राजनिष्ठेच्या अपमान जोंपर्यंत मोंगलांनीं केला नाहीं तोंपर्यंत कुबेरनगरी सम्राटसत्तेशीं एक पळभरही बेइमान होणार नाहीं. आपल्या धमकीला दबकणारी या धीरसेनाची तिरंदाजी नाहीं. या क्षणीं — या ठिकाणीं आपल्यासारख्या बंडखोराची —

शू०:- हां! चूप! तुम्हांला किंवा तुमच्या सम्राट-सत्तेला मी मानीतच नाहीं म्हणून मी बंडखोर नाहीं! चितोडाधिपती वीरसेनाविरुध्द मी कांहीं उठलों नाहीं.!

धी०:- प्रस्थापित सत्तेशीं द्रोह करणें यालाच बंड म्हणतात. म्हणून मी पुन्हां म्हणतों कीं आपल्यासारख्या बंडखोराची लढाईची रग जिरवायला मी तयार आहे. या धीरसेनाच्या अंगांत संचार करणारा रक्ताचा प्रत्येक थेंब आपल्या शीलाकरितां प्रत्यक्ष आपल्या देशबंधूशीं लढायला तयार आहे.

शू०:- तुम्हीही पण लक्षांत ठेवा कीं असल्या देशबुडव्या राजनिष्ठांचीं हाडें देशाकरतां मातीला मिळवायला हा शूरसेन कसूर करणार नाहीं. जा, धीरसेन जा. कुबेरनगरीच्या पोशिंदा असलेल्या एकवेळच्या चितोडच्या हा राजस्थानच्या भरू देशासाठीं भीक मागित असतां या थराला गोष्टी आल्या यापरता दैवदुर्विलास कोणता? जा राणाजी कुबेरनगरीपर्यंत सुखरूप जा- आणि जातांना तुमच्या वडीलकीला हा शेवटचा प्रणाम घ्या. (धीर० जातो) राजनिष्ठेनें फुलून गेलेल्या स्वार्थि

आत्म्या, तुझ्या हिमाचलासारख्या निश्चल-
तेचें कौतुक करावेसें वाटतें, पण अनामयीं
पडलेल्या सुवर्णकमलाला ओंजळीवर न
घेतां पायदळीं पिचवण्याची पाळी येते त्या-
ला काय इलाज? राजस्थानच्या रक्षकदे-
वतांनो, प्रसंगीं स्वजनद्रोहही पत्करून
देशाच्या निर्भेळ स्वातंत्र्यासाठीं किंचित्
आततायीपणा करणाऱ्या या शूरसेनाचे
सगळे व्यूह ढासळले, तर – तर त्याच्या
इच्छेची इष्टी निदान दक्षिणेंत तरी,
देवी पद्मिनीचें नांव सांगणाऱ्या शिसो-
दियाकुळाकडून – दक्षिणेंत गेलेल्या
सज्जनसिंहाच्या एखाद्या धरबरपरा-
क्रमी वंशजाकडून पुढें मागें घडवा,
तरच चितोडवरच्या सर्व जोहारांचे
आणि शिकी पानपत सारख्या घोर
रणसंग्रामांचें कांहींतरी चीज होईल!

→ राजनिष्ठेच्या फुलबाग ←

# मेघ-डंबरी.

स्थळ] बहीण-भाऊ [सौदामिनीच्या महाल.

शूरसेन:- सुखमय पारतंत्र्याचें मृगनक्षत्र पायावर
पडल्याकारणानें जनताजनार्दनाच्या
भुरळोपेंत राजस्थानची जरवडून पड-
लेली स्वातंत्र्यसौदामिनी सोडविण्याच्या
आशेच्या आधार घेऊन या चालत्याबो-
लत्या सौदामिनीच्या महालापर्यंत तर
आलों! किती भयाण काळोख हा? पण
ही आमच्या राजस्थानची शेवटचीच
अमावस्या ठरेल कां? काय, बेवकूब
राजनिष्ठेविरुध्द समशेर उपसणाऱ्या
मला, धीरसेनांच्या कडकडीत बंदो-
बस्तांत ताईच्या भेटीसाठीं या कपट-
वेषाचा आश्रय करावा लागल्याबरोबर
माझ्या आत्मविश्वासानेंही माझ्याशीं
कपट खेळायला सुरवात केली काय?
परमेश्वरा, क्षमा करा. नाइल्या नाइलाजानें
अवलंबिलेलें हें कपट शूरसेनाच्या
आयुष्यांतील पहिलें आणखी शेवटचें
आहे. सौदामिनी, माझ्या लाडके ताई,
मोंगलांनीं कुबेरनगरीविरुध्द तलवार
उपसली, मेघसिंहासना आणि म्हणजे तु-
लाही माझ्यासारखेंच बंडखोर ठरविलें
हें ऐकून तुझ्या हृदयाचे तुकडे उडाले
असतील, पण माझ्या हृदयांत आनंदाच
तुफान लाटा उसळत आहेत! स्त्रियांची
मनें स्त्रियांना वळवतां येतात याचा
अनुभव या माझ्या स्त्रीवेषानें तुझ्या दा-
सींना वश करून तुकताच आणून
दिला! ताई, त्याच न्यायानें जर या रा

जस्थानच्या रुसलेल्या स्वातंत्र्यसौदा-
मिनीला, ताई तूं हातीं धरलेंस तर
काय बहार होईल!
सौदामिनी (निजल्या निजल्या): कुणी - कुणी-
सुध्दां ही माझी केविलवाणी दशा
दूर करणार नाहीं कां? करील - केली
तर शूरसेनच करील. प - पण काय प-
हातें मी हें? शूरसेन बायको झाला?
शू०:- होय ताई, शूरसेनच काय, पण
सगळा राजस्थान आज बायकी बनला
आहे! जातीवन्तांनीं पारतंत्र्यांत
पिचत असतांना पुरुषार्थाचीं भूषणें
मिरवण्यांत काय किफायत?
सौ०:- भाऊ, नरजातीला न शोभणारा
तो स्त्रीवेष आधीं फेकून दे आणि
मग माझ्याशीं मोकळ्या मनानें बोल.
हें दृश्य माझ्या डोळ्यांना सहन होत नाहीं.
शू०:- माझी तरी तीच इच्छा आहे. पण
ताई, मला अभय आहे ना?
सौ०:- पुरुषासारखा पुरुष होऊन अशी
बायकी बोली तुला बोलवते तरी कशी?
शू०:- ताई, आज मी कुबेरनगरीचा शत्रू
आहे - उपऱ्या आलेल्या सम्राटसत्तेशीं
भोळसट राजनिष्ठेनें बांधून घेणारांचा
मी कट्टा दुष्मन आहें. महाराणी सौदा-
मिनीच्या महालांत निःशस्त्र उभा आहे
- पण ताई, सौदामिनीताई तुझा बालप-
णापासूनचा कौतुकाचा भाऊ म्हणून
उभा आहे. बिचकूं नकोस, भिऊं नकोस,
पिसाटलेला हा तुझा भाऊ एक याचना
करायला आलेला आहे - त्याला तेवढी
भीक घाल.

सौ०:- भाऊराया, रक्ताला रक्त ओळखल्याशि-
वाय कसें राहील? चितोडच्या पदभ्रष्ट पण
नरशार्दूल शूरसेन महाराणी सौदामिनी-
च्या पाण्यांत पाहणारा शत्रू असेल! पण
सौदामिनीताईची स्नेहभावानें भेट घेणारा
हा माझा भाऊराया – माझा भाऊरायाच
आहे! बोल, भाऊराया बोल, शील सला-
मत राखील अशी कोणतीही तुझी आज्ञा
म्हटल्या क्षणाला पार पाडायला ही तुझी
तयार आहे.

शू०:- पवित्र, मंगल ताई, शीलाला डाग लाव-
णारें कर्म करायला जातीवन्तांच्या स्त्रिया
तयार नसतात आणि तसें कर्म करायला
स्वप्नस्वप्नांतरींसुध्दां जातीवन्त स्त्रीजातीला
सांगत नाहींत. ताई, भगवान् शंकराच्या
विमल हास्या इतकीच माझी विनंती पवित्र
आहे. ती मान्य कर कीं तुझ्या शीलाचें
तेज यावच्चंद्र दिवाकरौ तळपत राहील.
मच्छींद्रनाथांचा महिमा वाढविण्याकरितां
प्रमिलेच्या स्त्रीसाम्राज्यांत प्रवेश करून घे-
तांना गोरखनाथाला स्त्रीवेष घ्यावा लागला.
तें श्रेय माझ्या आजच्या या साहसाला
मिळेल कां? ताई, ताई, या शूरसेनाला
देशोध्दाराचें वचन दे.

सौ०:- कोणत्या रजपूत कन्येला हें मानव-
णार नाहीं? शूरसेन हें वचन मी मोठ्या
आनंदानें देतें.

शू०:- तर मग सौदामिनी, सांग — स्वतांच्या
बडेजावीकरितां दुसऱ्याच्या वैभवावर
नागोबा होऊन बसणाऱ्या उमटांशीं
पोलादी निश्चयानें झुंजायला तयार
आहेस कां, सांग. ताई, राजस्थानच्या

रम्य राजमुकुट रजपुतान्याच्या डोक्यावर मिरवावा ह्मणून तुह्मी — या महाराणी सौदामिनीची सभशेर म्यानाबाहेर उसळी घ्यायला तयार आहे कां?

सौ०:- हां! शूरसेन, समजला आपला हेतू. मी आर्यस्त्री आहें. पतीच्या इच्छे-बाहेर माझी इच्छा-आकांक्षा उडी मा-रणें कालत्रयीं शक्य नाहीं! कुबेरनगरी-ची राणी ह्मणून मी तुह्मांला साफ सां-गतें कीं ही गादी जरी चितोडकडून आमच्याकडे आली असली तरी ती आज मोंगलसत्तेची मांडलीक आहे. ती आपल्या सम्राटसत्तेशीं कधींही बेइमान होणार नाहीं! आपल्या राज-निष्ठेकरितां ——

शू०:- राजनिष्ठा! सतीधर्म! सौदामिनी, कुठल्या मांत्रिकानें तुह्मांला हे वेडेचार शिकविले? पति पुरुषार्थाच्या मार्गानें जात असेल त्यावेळीं सतीनें त्याला सर्वोपरी सहाय्य करणें हा सतीधर्म मला समजतो. परंतु तो नामुष्कीची नागवळ वाट चालू लागला तर सतीनीं त्याला ताळ्यावर आणायला नको कां? नाई, राष्ट्रवीरांना जन्म देणाऱ्या मायजालीला [illegible] बुडव्या सतीधर्माचें हें उदाहरण तू घालून देऊं नकोस. आणखी नाई, राज-निष्ठा, राजनिष्ठा — या भरमसाट मोहनी-खालीं स्वतांच्या स्वाभिमानाचाही अपमान [illegible] करून घेणार काय? — माझ्या लाडक्या [illegible]ई, राणाजी धीरसेनांनीं दाखविला नाहीं [illegible]री सुभेदाराचा हा निर्वाणीचा खलिता [illegible]ुझ्या अंतःकरणाला पीळ पाडीत नाहीं कां?

सौ० (स्व० वाचून) :- शूरसेन, हा कुठून मिळविल
यान्चा अर्थ काय?

शू० :- ताई, कुबेरनगरीच्या राजनिष्ठेचा हा अप
मान आहे. धीरसेनांच्या हातीं पडलेला
पण आपल्या धोरणबाजीनें त्यांनीं तुला
अजून न दाखविलेला हा खलिता आ
पल्या हातीं घेतांना मला माझा जीव धा
ठेवावा लागला आहे! मग ताई —
माझ्या लाडके सौदामिनीताई, आतां
तरी आपलें वचन पाळायला तू तयार
आहेस कां?

सौ० :- शूरसेन, माझें माथें फिरं लागलें आहे
मला कांहीं सुचत नाहीं. सीतादेवीला
जन्म देणारी ही वत्सल भूमाता आपल्या
पोटांत यावेळीं मला आश्रय देईल तर
बरें होईल. भगवान् एकलिंगजी (मूर्छित प

बदामी (प्र० क०) :- हा काय गोंधळ आहे?

शू० :- हें पहा घाबरं नकोस! मी कोण, कसा
कशाकरितां आणि कोठून आलों याची
हुज्जत घालूं नको! मधां तुझ्याशीं कर
र करून आंत आलेली सुराबाई आणि
मी एकच आहों एवढें लक्षांत ठेव!
तुझ्या बाईसाहेबांच्यावर कसलाही प्र-
संग नाहीं! फक्त त्यांना थोडीशी झोंप
येत आहे!

सौ० :- झोप? शूरसेन, आतां कसली झोप!
कुबेरनगरीच्या राजांना विश्वासघातान
राजबंदी केल्याबद्दल गांवगंगा गरजत
होती, पण मी विश्वास ठेवला नाहीं;
बदामीसारख्या विश्वासूदासी खात्री
करीत होत्या, पण मी मोडता घातल

दयासागर सम्राट अकबराच्या अखत्या-
रींत असा अन्याय होणार नाहीं, असा
विरंगुळा मी माझ्या मनाला घालीत
होतें! पण आतां माझी खात्री पटली!
अगोदरच मन पार खाल होतें, त्याला
सुभेदारांच्या निर्वाणीच्या खलित्यानें
खवणी केली. जा, शूरसेन, या क्षणीं
मामंजीकडे जा, आणि त्यांना महाराणी
सौदामिनीच्या निर्वाणीनें संदेश सांगा—
—- पण नको, शूरसेन, माझें अबलेचें
मन; मर्दानी मगदुरांत खेळलें सवरलें
तरी तें आपल्या जातीवर गेल्याशि-
वाय कसें राहील? अजून माझ्या मना-
चा एक निश्चय होत नाहीं — शूरसेन,
उद्यांपर्यंत थांबा—उद्यांच्या दरबारानंतर
या सौदामिनीचें आपणाला शेवटचें
उत्तर मिळेल. (स्तब्ध पडते)
शू. (जातांजातां):— भगवती स्वातंत्र्यदे-
वते, या हीन दीन राजस्थानावरील
आपली कृपादृष्टी कायमची काढून
घेण्याचा तुझा मानस नाहीं ना? ब-
लिष्ट भवितव्यता कीं कर्तव्यतत्परता
यांच्याच निकाल या झगड्यांत लागून
जगाच्या इतिहास रंगणार आहे कां?
शूरसेनाच्या शूर भगिनी, काळाच्या
करड्या नजरेला नजर भिडविण्याची
मनाची तयार करण्यासाठीं यावेळीं
तूं खुशाल शांत झोप काढ! (जातो)

स्थळ ] लढजोड [ रस्ता.
वीरसेन:— काय करावं! या हृदयांत चाल-
लेला हलकल्लोळ कांहीं केल्या शांत

होत नाहीं. खरें आणि खोटें यांच्यामधल
सूक्ष्म भेद ~~प्र~~ प्रत्यक्षपणानें न जाणणा
आंधळ्या न्यायदेवतेची आजपर्यंत बांध
केलेली पूजा लाथेच्या एकाच ठोकरीनें
उधळून देऊं कीं तिच्यापुढें नम्रपणाने
हात जोडूं? .... राजनिष्ठे, राजद्रोही ठरले
ल्या राजनिष्ठे, काय केलेंस हें? तुझ्या
पायीं शूरसेनासारख्या पाणीदार मोत्यां
कुबेरनगरीनें जीवाचें रान करण्यासा
रानोमाळ फेकून दिलें! त्यानें उभारलेल
बंडांत आम्हीं आमच्या निष्पाप स्वध
र्मीयांचे खून पाडले - पाडतों आहोंत
अरेरे! स्वधर्मीयांच्या, स्वदेशबांधवांच्या
विशुध्द रक्तानें बरबटलेले हे पा
हात राजनिष्ठ धीरसेना, तू कसे
धुवून काढणार? सूनबाई, तुझी काय
अवस्था झाली असेल? तुझ्या आणि
कुबेरनगरीच्या कल्याणासाठीं भावी प
रिस्थितीशीं झगडण्यांत मी कोणत्या श
क्तीचा धांवा करूं? हरदम आकाशांतून
लुट्टून पडणाऱ्या स्वतंत्र तेजःपुंजानो,
या कुबेरनगरीच्या ओंजळ्यांत शिरून रा
जस्थानचें तेज इतकें वाढवा कीं मूलमि
त स्वातंत्र्य त्यापासून निष्पन्न होईल.

इब्राहीमखान (प्र.क.) :- सलाम, धीरसेनजी, मला कांहि
खासगी मसलत करायची आहे!

धी० :- खुशाल करा.

इ० :- उध्दट आणि बंडखोर शूरसेनाशीं चाल-
लेल्या झटापटींत परवांच्या दंगलीमुळें
सुभेदारसाहेबांचा आपल्याबद्दल भलताच
ग्रह झाला आहे! तेव्हां जरा सामोपचारानें

धी०:- सामोपचार? आतां कसला सामो-
पचार? खानसाहेब, आमच्या राजनिष्ठेचे
धिंडवडे प्रतिक्षणाला निघत असतांना-
सुध्दां जर आम्ही सामोपचारानें वागलों
तर आमचे पूर्वज स्वर्गांतून आमच्या
तोंडावर थुंकतील, आमच्या मातापितरांचे
स्वर्गांत चमकणारे आत्मे आमच्या या निः-
सत्त्व, भेकड कृत्याबद्दल आपण होऊन
संततीहीनांच्या नरकांत उडया घेतील!
खानसाहेब, तुम्ही जर आमच्या जागीं
असतां तर शांत राहिला असता कां?
०:- माफ नसतों! पण राणाजी, जरा बे-
तानें घेतलें तर अजूनही तडजोड होईल.
मी तुमच्या स्थितीबद्दल फार दिलगीर आहें.
धी०:- हे कुणाचे शब्द? एका यवनसर-
दाराचे? आहाहा! खानसाहेब, आपल्याला
राव मेघसिंहानें पैगंबर म्हटलें तें योग्य
होतें! सगळ्या मोंगलांचीं अंतःकरणेंजर
तुमच्यासारखीं असतीं तर हिंदुमुसलमान
आज बंधुभावानें वागले नसते कां?
०:- असतें! असतें आणि आहे यांत
जमीन अस्मानाचा फरक नाहीं कां? धी-
रसिंहजी, तुमच्या धर्माच्या आड येऊं
नये अशी माझीच काय, पण खुद्द अक-
बर बादशहाचीसुध्दां इच्छा आहे! पण
करणार काय? तुमच्या राज्यांत धर्माच्या
नांवावर सावळागोंधळ घालणारे उद्दाम
लोक वावरत असतात! आतां यापुढें
तरी, कुबेरनगरी राजनिष्ठ रहावी अशी
माझी फार इच्छा आहे. . .
धी०:- तें आपल्या हातीं आहे.

रु० :- यावेळीं राणीसरकारचें मन आपणच
आवरून धरलें पाहिजे.

धी०:- खानसाहेब, खंजीरभोकसणीवर खा
पाण्याचा सडा संतापाला कारण होतो
आपणच सांगा, ज्याचें स्वतांचेंच मन भ
उकून गेलें आहे तो दुसऱ्याचें मन कि
तपत आवरणार? खानसाहेब, कारण
नसतांना बाळ मेघसिंहाला पिस्तेखानो
राजबंदी करून नेल्याची बातमी ठाम
आह्मांला समजली आहे! राजस्थान
रानशाही पिस्तेखानासारख्या मिजाशी
मोंगलाचीच कांहीं मिरास नाहीं! र
जस्थानच्या जातीच्या लेकरांचा हक्
सम्राटसत्तेला समूळ कसा खच्चीं क
रतां येणार? आणि कुबेरनगरीवर
झालेल्या या धडधडीत अन्यायाचा उता
काय, तर सुभेदार निर्वाणीनें लिहिता
कीं कुबेरनगरीनें दांतीं तृण न धरल
स शाहिस्तेखान तिच्यावर चालून ये
ल! या सर्व प्रकारानें सूनबाईचें म
स्तक अगदीं फिरून गेलें आहे!

रु०:- मग काय होणार अल्ला जाणे!

धी०:- त्या तुमच्या परवरदिगारला इतक
कष्ट कशाला? आमच्या राजनिष्ठेचा
योग्य तो मोबदला मिळाला नाहीं त
परिणाम हा ठरलेलाच आहे. आह्मी र
पूत स्वामीसाठीं स्वतांच्या सर्वस्वावर
निरवारे ठेवूं, पण स्वामीकडून अपमान
—कालत्रयीं सोसणार नाहीं! मांडलि
झाले ह्मणून ते मेलेले असतात
कां त्यांना मान नसतो?

रु०:- असें कसें होईल? राणाजी, तुमच्

सारख्या विचारी माणसाचें डोकें जर
फिरून गेलें तर शूरसेनासारख्यांना
दोष काय म्हणून द्यायचा?-- एकंदरीत
कुबेरनगरीच्या बाबतीत मोठा अन्याय
झालेला दिसतो!
धी०:- फत्तेपूर शिकीकडे धार्मिक बंड-
खोर राजरोस उलाढाली करीत असतां
त्यांच्याकडे ढुंकून बघण्याचीही तुमच्या
स्वयंभन्य सरकार दरकदारांची चाली
होत नाहीं; आणि राजनिष्ठ कुबेरनग-
तील एखादा बंडखोर आशेच्या आपुल-
कीनें किंवा आपुलकीच्या आशेनें चुकून
माकून वावरला, तर भलत्याच गोष्टीचे
मेर करून प्रत्यक्ष तत्त्वाधिपती मेघ-
सिंहाला तुम्ही बंदी करतां हा न्याय
नातरिविकडचा काय! असल्या आचरट
अन्यायाचा प्रतिकार तडफदार रत्ना-
कडून कसा होईल याची आपणांस
कल्पना तरी आहे काय?
०:- पण राणाजी, माझी सारी पत
रीला घालून विनंती करतों कीं होईल
तितकें करून राणीसरकारचें मन
सावरून धरा आणि दरबारांत शांतउत्तर--
ती०:- तुमच्या माणसांकडून थोडेंजरी
अपमानकारक असें कांहीं घडेल तर
सौदामिनीची तलवार आज बाहेर पडेल!
०:- पण मी शब्द रचलेलो आहे ना?
धी०:- तेवढ्यासाठींच तर मी कबूल
करतों. पण जर कां दरबारांत कांहीं
विपरीत घडलें तर पुढच्या परिणा-
माला मी मुळींच जबाबदार नाहीं!
खानसाहेब, आपल्या आजपर्यंतच्या

वर्तनाकडे पाहिलें म्हणजे अंतःकरण
कसें उचंबळून येतें! आणि प्रसंगी
पुढच्या खाईंत पाऊल टाकतांना अ
पली मुत्सद्दी मूर्ति डोळ्यांपुढें उभी
हते! पण वेळ आल्यावर त्याला तरी
काय इलाज? (जातो)

इ०:- काय इलाज!! सुभेदारसाहेब, आपल
अघोरी अरेरावीच्या हा प्रताप परा! ब
दशाही लब्यतीप्रमाणें प्रजेशीं गुण्या
गोविंदानें वागण्याचें धोरण आपण
वकरच स्वीकारलें नाहीं तर - तर
आपली कंबख्ती भरली एवढें पक्कें
लक्षांत ठेवा! (जातो)

---

स्थळ :] निर्वाणीचें उत्तर! [कुबेरनगरीचा दरबार]

(महाराणी सौदामिनी येते. तीस दिल्लीरखानाशिवाय सर्व खडी ताजीम देतात)

इब्राहिम शिवायसर्व:- महाराणी सौदामिनीचा जयजयकार
असो! महाराणी सौदामिनीचा जयजयकार

दिल्लीरखान:- नाहीं! नाही! सम्राट अकबर बादशहाचा
जयजयकार पहिल्या प्रथम झाला पाहिजे!

सौदामिनी:- खबरदार! या कुबेरनगरींत - या मेघाति
हाच्या कुबेरनगरींत - या सौदामिनीच्या
कुबेरनगरींत आमचाच जयजयकार
प्रथम झाला पाहिजे. आमच्या लोकांना
सम्राटसत्तेची ओळख आमच्या मार्फतच
असते. पदच्युत केलीं तर शूरसेनांसारखी
राशीला बसलील म्हणून मांडलिकीचें मं-
गळसूत्र गळ्यांत बांधून कांहीं कांहीं
राज्यें सम्राटसत्ता जाणूनबुजून राखीत
असते, सत्तेच्या या सडासंमार्जनांत मां-
डलिकीच्या स्वास्तिकांवरच मानाचें हळदी

दीकुंकू वाहिलें जात असल्याकारणानें
आमचाच जयजयकार अगोदर व्हावा
हें साहजिक आहे. तथापि आजचा वक्तव्य
मोठा बांका आहे. आजवरच्या सरळसूत
साम्राज्यसरणीला सम्राटांच्याच सत्ताधा-
र्‍यांनीं नागमोडी वळण लावलें असल्या-
कारणानें स्वाभिमानाच्या सिंहगर्जनेसाठीं
आज आमचा आणि एकट्या आमचाच
जयजयकार झाला पाहिजे.

सर्व:- सम्राज्ञी सौदामिनीचा जयजयकार असो.

(सौदा० सिंहासनावर बसते)

दिल्ली०:- अपमान! अपमान!!

सौ०:- अपमान, अपमान म्हणून टाहो फोडून
हिमालय-महासागरांच्या चिरबल कालावि-
णारांनीं दुसऱ्यांच्या मानापमानाला डोळ्यांत
तेल घालून जपायला नको कां! या राजनिष्ठ
गादीचे मालक मनुष्य प्राण्याच्या जन्मसिद्ध
हक्कान्वयें शिकारीला गेले असतां, त्याच
ठिकाणीं पिस्तेखान फिरतीला आले म्हणून
पिस्तेखानांला कशानें कमीपणा आला, आणि
सम्राटसत्तेच्या तेजःपुंज मुकुटांतला कुठला
हिरा कोळशेखाक झाला! भूल भूल म्हणून
भूल झपाटून धूप घालून घेण्याकरतां बे-
ताळी चाळे करण्यांत सम्राटसत्तेचे शहाणे
सेवक गौरीशंकरासारखा गर्व वहात असले,
तरी स्वाभिमानी अंतःकरणांला तो गंगोत्रीच्या
सरसा वाटतो आणि म्हणूनच तीं सिंधुनदा-
सारखा सवता सुभा करीत असतात!
आपण मोंगलाईतले मुरब्बी, त्यांच्या दर-
बारांतून वावरलेले, तुम्हांला दरबारी शिस्त
पाळायची अक्कल नको कां!

दि०:- ती शिस्त इथें कशाला? या तुमच्या

दरबारांत कशाला? तुम्ही बोलून चालून
आमचे मांडलीक!

सौ०:- बोलून चालून मांडलीक राहण्याइतपत
कारस्थानानें आम्हांला आजपर्यंत राहतां
आलें असतें तर सोन्याहून पिवळें झालें
असतें! पण तें कसें कां असेना, आम्ही
मांडलीक असलों तरी इथें तुमच्या स
म्राटसत्तेच्या ठिकाणीं होतों! मग, आम
उपमर्दानें तुम्ही आपल्या सम्राटाचाच अ
प्रत्यक्ष अपमान केला नाहींत कां?

दि०:- बंडखोर, बडबड बंद!

सौ०:- अन्यायाविरुध्द हें बंडच आहे, समजलांत

अकबर (हकीम):-(स्वगत):- दिल्लीहून ज्या कार्यासाठीं मी
इथें आलों तें इतक्या लवकर सफल होईल
असें मला वाटलें नव्हतें! कुबेरनगरी आ
तांशा अशी धुमसती कां, याचा उलगड
चक्क आज झाला! बेवकूब हातीं सत्ते
कसा दुरुपयोग होतो याचें प्रत्यंतर पुरेपूर
पटलें! मोहब्बत राखून राजा तोडरमल्लास
रखीं माणिकमोलाचीं माणसें मिळवून
घेण्यासाठीं मी जीवापाड मरावें आणि
या असल्या हरामजाद्यांनीं माझी कुत
रओढ ही अशी करावी अँ!

सौ०:- हकीमसाहेब, असे घाबरलात कां?
राजदरबारीं असला घोडेगोंधळ केव्हां
केव्हां व्हायचाच! माझा हृद्रोग काय आ
याचा उलगडा आतां तरी आपल्याला
पडला कां? याच्यावर आपल्याजवळ को
ठून औषध असायला?

हकी०:- यालाही उतारा देईन तरच पुढें धंदा
करीन. (स्व०) कुबेरनगरीसंबंधांत झाले
ला अन्याय दूर केल्याशिवाय बाबर

ादशहांच्या न्यायनिष्ठ सिंहासनावर बस-
ण्याचा मला काय अधिकार! (उ०) राणी-
रकार, मला आतांच्या आतां निरोप
दिकेल कां!
सौ०:- खुशाल!
दि० :- नाहीं! त्याला आम्ही मोकळा सोडूं
देणार नाहीं! हा कुऱ्हाडीच्या दांडा आ-
म्हांला गोत्यांत आणायला कदाचित्
कारणीभूत व्हायचा! म्हणून घरच्या म्हा-
तारीचे काळ होऊनही आम्ही साफ सां-
गतों कीं आम्ही याला मोकळा सोडूं देणार नाहीं!
सौ०:- खामोष! हकीमांच्या केसाला धक्का
लागेल तर केसाच्या पवायवागणिक
प्राण बेचावे लागतील! जसवंतसिंग, जा
हकीमांना आपल्या राज्याबाहेर सुरक्षित
पोंचवून परत या, जा! (जस० कुजरा व
हकीम सलाम करत जातात)
दि०:- बंड, बंड ते यापेक्षां दुसरें काय असतें!
सौ०:- तें आमच्यापेक्षां तुम्हांलाच माहित!
प्रजेंत बेदिली माजवावी आणि प्रस्था-
पित सत्तेच्या विरुध्द प्रजेला बाहेर
करायला लावावें हें हिंदु संस्कृतीचें औचित्य
नाहीं! नाविष्णुः पृथिवीपतिः ही राज-
नीती लक्षांत वागवूनच, प्रजेकरितां
प्राणांचीही आहुती देण्याची अनुच्चारित
प्रतिज्ञा करून हिंदु राजे सिंहासनावर
बसत असतात. कधीं कोठें वैयक्तिक
स्वार्थानें डोकें वर काढल्याकारणानें कुठें
त भाऊबंदकीची बेबंदशाही भडकली
असेल; पण प्रजेनें राजावर शस्त्र धरून
क्रांति केल्याचें अगर हक्कदार राजघरा-
ण्याला मातीला मिळवल्याचें — तुम्ही

ऊठ बस ज्याच्या नांवानें उरकाव्या फोडल
असतां, त्या बंडाचें औषधापुरतेंसुध्दां उदाह
रण आजपर्यंतच्या आमच्या इतिहासांत
निदान आम्हांला तरी माहित नाहीं. हिंदू
रक्तांत तसला विकारच परमेश्वरानें काल
विला नाहीं! तथापि अन्यायाची चीड मात्र
थेंबाथेंबागणिक थयथयाट घालित असते
आणि स्वाभिमानाचा पीळ, पुसल्या बांध
लेल्या पारतंत्र्यांतही मनाच्या उचलीने
भाग्यशाली भविष्याकडे डोळे रोखायला
कमी करीत नाहीं!

दि०:– हाच नांगा ठेचून काढण्यासाठीं सम्राटसत्ते
च्या सुभेदारीच्या तुम्हांला सक्त हुकूम आहे
कीं तुम्ही बिनशर्त शरण आलें पाहिजे!

सौ०:– काय, बिनशर्त?

दि०:– हो, हो! बिनशर्त! सम्राटसत्तेच्या मा
नपानाच्या प्रभावळींतील पिस्तेरखानांत
ज्या जंगलांत शिकारीला जाण्याची लहर
लागली, त्याच जंगलांत मोहबतीनें राख
लेल्या मांडलिकांनीं अगाऊ कळविल्याशि
वाय शिकारीचे चोचले करीत फिरावे, हे
सम्राटसत्तेच्या नाकाला मिरच्या झोंबवणे
आहे. त्याची पुरी व्यायची असेल, तर
सर्वस्वी सम्राटसत्तेच्या ओंजळीनें पाणी
पिण्याची तयारी दाखवून बिनशर्त शरण
आलें पाहिजे! नाहींतर ——

धीरसेन:– नाहींतर काय होणार? खानसाहेब धम
की देऊन रजपुतांना जरब बसविण्याचे दि
वस कदाचित् काबाच्या कोठारांत शिल्लक
असतील, पण अजून तरी त्यांचें अपश
कुनी दर्शन राजस्थानला दुर्मिळ आहे है

लक्षांत ठेवा. तरीच्या तराजू, तराजूची
तरवार आणि तख्त करणारे हरामखोर
मुत्सद्दीगिरीचे जरासंधी फासे भारतपुत्रांच्या
हातांत खेळायला येईपर्यंत, त्या अवल-
क्षणी दिवसांची पडछायाही शनीच्या
वक्रदृष्टींतून राजस्थानवरच काय पण
सगळ्या भारतराष्ट्रावर पडेल, हें स्वप्न-
स्वप्नांतरीं सुध्दां संभवनीय नाहीं! आजच्या
कुबेरनगरच्या प्रत्येक जीवंत प्राण्यांत
स्वामीनिष्ठेची आणि स्वाभिमानाची ज्योत
तारखी तेवत असलेली तुम्हांला दिसेल!
नाहीं तर काय होणार!
दे०:– आमच्याशीं सामना द्यायला तयार व्हा!
सौ०:– आज, आतां ही कुबेरनगरी तुम-
च्याशीं रणांगणावर दोन हात करायला
तयार आहे. खानसाहेब, आजपर्यंत या
राजस्थानचे लढवय्येच तुमच्याशीं झुंजले
असतील, पण आज एक रजपूत अबला
आपल्या आमलेजावर तुमच्याशीं लढायला
तयार आहे.
इब्राहीम:– राणीसाहेब,
सौ०:– कसली राणीसाहेब! बंडखोर—
सौ०:– हां! खान, आपण वकील या नात्यानें
इथें आला आहांत! पतकरलेल्या पेशाची
मर्यादा सोडून एकही वायफळ शब्द यापुढें
बोलाल, तर प्रसंग फार निराळा येईल!
दे०:- राणीसाहेब, जरा सबूर!
सौ०:– खान, दिलदारपणानें सारवर पेरण्यासाठीं
कशाला धडपड करतां? डोकें शांत ठेवण्या-
सारखी आतां काय बाकी राहिली आहे?
या सौदामिनीच्या हृदयाच्या चिंधड्यान् चिंधड्या
उडाल्या तरी तिनें शांत रहावें?

इ०:- मग काय, रणांगणावर सम्राटसैन्याशीं

धी०:- खानसाहेब, एकदां रणाशींग फुंकल्यावर यापजयासाठीं जप कोण करीत बसणार! कुबेरनगरीच्या कपाळीं सर्वस्वाच्या सत्यानाशाच कोरला असेल, तर टिपून सान्या प्रजेचीं मस्तकें रणदेवतेच्या पायांवर तुटून पडतील, पण ते मृतात्मे स्वाभिमानाच्या स्वर्गीय समाधान तरी वीरवृत्तीनें लुटीत राहतील.

इ०:- राणीसाहेब, आपल्या परिस्थितीचा विचा

सौ०:- तेंच टिपण तुझीरी साधा, असेंच मी हुझांला सांगतें.

दि०:- मग आमच्या प्रश्नाचें उत्तर!

सौ०:- (तलवार उपसून दाखवते)

इ०:- राणीसाहेब,

सौ०:- नादलाज आहे खान! (जाऊं लागते)

दि०:- बंडखोर, खबरदार पुढें जाल तर!

(तरवार उपसतो, इब्रा० आवरून धरतो)

शूरसेन:- (तलवार उपसीत प्रवेश क.) :- काय खबरदार

दि०:- या अल्ला, परवारदिगार, ये तो कदिन काल है!

---

स्थळ] पलायन [ अरण्य

दिलेरखान:- (ससैनिक) :- पकडो, पकडो काफरकू

शूरसेन:- कुणाला पकडणार? या शूरसेनाला? या मानी शूरसेनाला?

दि०:- बंडखोर कसला मानी? बंडखोर उसे पकडो, काफरकू अब्बीके अब्बी पकडो.

शू०:- काय बिशाद आहे तुमची? टोल्याला टोला लगावीन. (सैनिक पुढें येऊं पहातात) या, या तुमचे बाप जर रजपूत नसतील तर पुढें या आणि या शूरसेनाला पकड

तुमच्या आयाबहिणी जर रजपूत अस-
तील तर पुढें या आणि आपलीं शस्त्रें
चालवा. रजपुतांनींच या शूरसेनाचा शे-
वट केला आणि गुलामगिरींत कायमची
उडी घेतली तर सूर्यपोटीं शनैश्चर
जन्माला आल्याचें सार्थक होऊन स्व-
तंत्रवृत्तीच्या राजस्थानचें नांव इतिहासां-
तून पार धुवून तरी निघेल! मर्द म्हण-
विणाऱ्या नामर्दांच्या नरककुंडांत राज-
स्थाननें रडवेपणानें जगावें असें एक
क्षणभरही या शूरसेनाला वाटत नाहीं.
घेऊं घ्या देवाचें नांव आणि चालवा
आपल्या समशेरी. उपसा, उपसा त्या
तरवारी उपसा. तुमचा भाऊ, तुमच्या
मातांचा हा मानलेला मुलगा, राजस्था-
नचा हा एकनिष्ठ बंदा तुमच्यापुढें छाती
ठोकून उभा आहे.

दे०:– अबे, उरले क्यंव? पकडो काफरकू.

शू०:– खांसाहेब, काळ कसा विचित्र
आहे पाहिलात? सत्तेच्या दुधानें फु-
सफुसणाऱ्या तुमच्या जिभलीपेक्षां, जा-
तीच्या प्रेमावर पोसलेली माझी जि-
भलीच जास्त जोरकस ठरली! खांसाहेब,
खात्री आहे कीं आंतडीं पिळणारा शब्द
बोलेन, तर गुलाम झालेले हेच माझे
देशबांधव तुम्हांला कैद करतील. पण
तुमच्यासारख्या घमेंडखोराला रणांग-
णावर चीं-चीं करावयास लावण्याचें सा-
मर्थ्य या माझ्या मनगटांत असतांना
तो भेकडपणाचा मार्ग मी कशाला स्वीकारूं!

दि०:– हें तू कुणापुढें बडबडतोस?

शू०:– एका मोंगल सरदारापुढें. खान-

साहेब, काय करूं? तुमच्या उज्ज्वल कर्तृत्व-
शक्तीवर, तुमच्या साहसावर मन कसें भुं-
ग्यासारखें लुब्ध होतें! पण तुह्मी परके
पडतात! शत्रूंच्या राज्यें निष्कारण
घशाखालीं घालून अन्याय करीत आल
तसें नसतें तर आमच्या तरवारी म्यानाच्या
बाहेर कशाला पडल्या असत्या?

दि०:- कशा कां कारणानें असेना, तुमच्या
तरवारी सरसावल्यावरती आमच्या
तरी स्वस्थ कशा बसतील?

(चकमक झडते)

शू०:- तुमच्या चरणधूळींत स्वतांचीं मानी
मस्तकें लोळवण्यांत मोठमोठ्या रणझुं-
जारांना मोठेपणा वाटत असेल; पण स्व-
भिमानाच्या उर्मीनें उपसलेली समशेर
त्या जीवाची हाडें जमीनदोस्त होईपर्यंत
हातची सुटत नसते. (वार करून सर्वांस प-
विते)

---

स्थळ :- रउकी लढाई! [प्लेंच.

[ बदामी खारीक सिंगास ओढीत प्रवेशते. बेदाणे
मागून येते. सर्व सशस्त्र ]

खारिक०:- अग पण हो, अग पण हो! हें आहे काय
बायकोच्या नवरा ह्मणजे काय तरवारीचा क
मरपट्टा कीं तिच्या प्रत्येक हेलकाव्याब-
वर त्याला हिसका बसलाच पाहिजे!

बदा०:- एक शब्द अधिक बोलूं द्यायची नाहीं
आतां तर चकमकीला सुरवात झाली

# रडकी लढाई

( बदामी खारिकसिंगास ओढीत प्रवेशते. बेदाणी मागून येते. सर्व सशस्त्र )

खारीकसिंगः– अग पण हो ! हें आहे काय ? बायकोचा नवरा म्हणजे काय तरवारीचा कमरपट्टा ? कीं तिच्या प्रत्येक हेल-काव्याबरोबर त्याला हिसका बसलाच पाहिजे !

बदामीः– एक शब्द बोलं नका बोलून द्यायची नाहीं अगदीं ! आतां तर चकमकीला सुरवात झालीच म्हणावयाची ! माझा शब्द फुलासारखा झेलणार कीं नाहीं सांगा एकदां !

बेदाणीः– अहो, म्हणा 'हो !' म्हणून, नाहीं तर आतांच एकलिंगजीचं नांव ध्यायची वेळ.

खा०ः– अग, अशी भितेस काय ? चकमक काय हिलाच ठाऊक आहे ? अन् आम्हांला माहीत नाहीं ? दाढी जशी भगवान शंकराशिवाय एकाहि देवाला झेंबंत नाहीं, तशी चकमक करून आग लावावयची नी निशा करावयची ही विद्यासुद्धां त्या महादेवालाच माहीत ! त्याचा मी एकनिष्ठ भक्त हिला भ्यायला मी कां लाजाळू ?

ब०ः– पक्के निलाजरे आहांत ! नाहीं तर अजून तुमची निशा उतरली नसती कां ?

खा०ः–निशा उतरून कसं चालेल ? एवढा बाईलबुध्या कृष्ण पण त्यानं सुद्धां भर रणांगणावर अर्जुनाला सांगितलं—

बे०ः– "या निशा सर्व भूतानां तस्यां जाग्रति संयमी । यस्यां जाग्रति भूतानिसा निशा पश्यतो मुनेः ॥"

खा०ः– म्हणजे सगळीं पिश्चाच्चें जी निशा करतात तिच्या ठिकाणीं जो जागरूक तो उद्वात्त पुरुष आणि तिच्या संबंधीं सगळी पिशाच्चें जागरूक असतात त्या निशेकडे नुसते बघत राहणारे ते ऋषि.

ब०ः– हां, तोंड सांभाळा. भगवान् कृष्णाचा केवढा अपमान हा ? उगीच आतां तोंडाला तोंड द्यायला लावूं नका मला.

खा०ः– माझ्या तोंडाला तोंड देणार नाहींस, तर काय सगळ्या जगाच्या ? कां गांवच्या ?

ब०ः– उगीच गांव गोळा करूं नका. अगोदर लढाईचे हात शिकायला तयार व्हा.

खा०ः– लढाईची घमेंड तुझ्यासारख्या सौदामिनी बाईसाहेबांच्या दासीला कशाला ग ? वीज आणि तारा एकाच आकाशांत नांदत असल्या तरी पहिलीची सर दुसऱ्यांच्या फापटपसाऱ्याला नाहीं ! वीज ढगांचें पाणी साऱ्या जगाला पाजते, तर तारेच्या पाण्यावर सदाच ढग आलेले असतात. राणी-वशांतल्या रखवालीन रणांगणावरचा रानदांडगेपणा अंगी येत नाहीं. त्याचा अनुभव तुला द्यायला शत्रूबित्रूच कशाला पाहिजे ? हा तुझा मर्द आतां तुझ्याशीं सामना करायला तयार आहे.

बे०ः– अरे देवा !

ब०ः– अस्सें काय ? या रणधीर, या तर असे. हूं ! बेदाणी, काल शिकवलेले हात तू त्या बाजूला सुरूं कर, इकडून मी चाल करतें. पाहूंया मर्वे हे वीर शिरोमणी कितपत टिकतात ते.

खारीकसिंगः––म्हणजे तू संक्रांत, आणि ही बेदाणी तुझी कर वाटते ! वाहनोपवाहनावर बसुन आलेल्या संक्रांतीच्या मधल्या राक्षसासारखी माझीं दैना उडविणार, होय ! पाहूं तरी तुमची आतां काय शामत आहे ती ? आपल्यापैकीं एकजण जमीन दोस्त होईपर्यन्त हे युध्द माजले पाहिजे.

( लढू लागतात. खारीकसिंग मध्यें जमिनीवर लोळण घेतो )

बदामीः– अहो, हें काय ? अशी लोळण कां मारतां ?

बे०ः– अगबाई, हे काय अरिष्ट ओढवले ! मेले, घात केलास ग घात केलास ? सौभाग्य नडवलंस नी नरकाचं साधन केलंस ? आतां मी लग्न तरी कुणाशीं करणार !

खारीकसिंगः–माझ्याशीं ? बेदाणी अशी घाबरलीस काय ? लढाईचा कण्टाळा आल्यामुळं हा वीर जरासा जमीन दोस्त झालाय इतकंच ? बाकी, हे बध माझं नाक वरच आहे.

बदामीः—मग संपलीच म्हणायची लढाई !

खारीकसिंगः—( उठून) शाबास वीरांनो शाबास ? शहान शहा अकबराच्या दूरदर्शी धोरणाचा आतां विजय झाला ? जगांत शांतियुद्धाचा अवतार व्हायला असेच पडेपणाचं धोरण धरलं पाहिजे. बेदाणी, जयाचें हिरवेगार निशाण उभार.

( पडद्यांत तास वाजतो )

बदामीः—अगबाई, पहारे पालटलें वाटतें ? मला आतां गेलंच पाहिजे.

खारीकसिंगः— जावं ? नाक ठेंचलेल्या अबले, नाक मुठींत धरून जाव ? आम्हीही आतां मोठे नाक ठेचायच्या उद्योगाला लागतो साधलं तर बरं, नाहीं तर तलवारीची मूठ हातांत धरण्यापेक्षां नाक मुठींत धरण्यानेंच शांति तुष्टिपुष्टी मिळणार !!

स्थळ ] वीज कडाडली! [ जंगलांतील देऊळ

सौदामिनी :- मोंगलांचा विजय! दुर्दैवी
राजस्थाना, तुझ्या चारित्र्यपटावर कुठ-
ल्या शनीच्या हा चरा पडतो आहे!

धीरसेन :- सूनबाई, -- कसलें दृश्य हें?
तुझ्या डोळ्यांच्या कोंदणातला नेहमीं-
चा दैदिप्यमान हिरा आज असा लाल
का झाला? कोणत्या राहूकेतूची नजर
पडली म्हणून आज अशी ही पौ-
र्णिमेची अमावस्या झाली?... बाळ,
तू बोलत का नाहींस? चालू झालेल्या
रणदिव्यानें कां तुझी छाती धास्ताव-
ली? सौदामिनी, बोल तुझ्या कसल्याही
दुःखाला माझी छाती झेलून धरील,
सूनबाई, तुझ्या रक्षणाकरता पडत्या
आकाशाचें निवारण स्वतांच्या कपाळ
शोक्षानें करीन. पण बोल, हें पाणी
तुझ्या डोळ्यांत कशाकरतां?

सौदा. :- मामंजी, काळचक्राच्या कोण त्या
खाचेंत आपला देश सांपडला आ
माझ्या हाडमासांच्या एकजीव रे
घानें, फार काय आपलीसुद्धां ती
गल झाली तरी ती अघोरी खा
भरून येईल असें मला वाटलना
माझ्या गालांवर पंजाबचे दुआब
तयार होतात त्याचें कारण, माम
जी, तें आहे. माझा मूळचा स्त्रीस्व
भाव अनावरपणें जागा होऊन
रणरंगी कठोरता माझ्या हृदया
न नष्ट झाली नाहीं. वज्र फुला
सारखें चुरगळलें जाईल, पण मे
सिंहांची ही सौदामिनी पर्वतापेक्ष
ही अचल राहील. खरखलेल्या
रणकल्लोळांत दीनदुबळ्यांच्या हृ
दयभेदी विलापांकडे पाठ फिरवून
राष्ट्रोध्दाराच्या पवित्र कळसावर वि
जयश्रीचा दिमाख म्हणून माझें म
स्तक अभिमानानें ठेवून द्यावयास
मी तयार आहें. पण मामंजी, अ
पजयानें माझें मस्तक फिरायची पा
ळी येते. रणांगणावर तडफडणाऱ्या
जीवांच्या क्षणिक किंकाळ्या अपज
यानें राजस्थानांत अखंड स्मशान
संगीत नाहीं का गात रहावयाच्या
चार तोंडांच्या ब्रह्मदेवानें राजस्था
नच्या ललाटीं कोरलेला हा विधि
संकेत शेषाच्या हजार तोंडांनीं
माझ्या मुग्ध अंतःकरणांत कल्लोळ
करीत असतां, कोमलविकारांचे
सारे धागेदोरे पिळवटून त्यांचा

करुण रस वाहू लागला तर अ-
नैसर्गिक आहे काय? मामंजी, वरचे-
वर मनांत येते, कीं याच क्षणाला
आत्मयज्ञ करून —
धीर०:- अरेरे! सौदामिनी, कशाला
हा भलता विचार? तुझ्यासारखी
राजस्थानची रणदुर्गा आपल्या
तलवारीच्या जोरावर विधीसंकेत
कशावरून बदलणार नाहीं? कदाचित्
णारा भावी आत्मयज्ञ अविचारानें
आज तूं अकालीं करून घेतलास,
र दैववशात या फिरत्या कालचक्राची
ांच शत्रूच्या रक्तामांसांनीं भरून
घण्याचा संभव असतां आपल्याच
नलेल्या हाडमांसानें भरून निघेल.
[पडदा आंत:- आग! आग!! सरकार दारुगोळा
ला! दारुगोळा खलास झाला! कोणी तरी
तुरी केली!!!]
दा०:- विश्वासघात! दगलबाजांच्या
स्तकांचे गोळे करून शत्रूवर फेका.
जस्थाना, फितुरीनें तुझें वाटोळें होत
हे!
र०:- राठोडघरची ही जयचंदी ज्यां-
ा स्वप्नस्वप्नांतरींसुद्धां ध्यानींमनीं या-
ी नाहीं ते हें माझें सैन्य राणीसरकार
ा सेवेला हजर आहे, काळजी नसावी!
०:- मामंजी, रणशूर सरदार हो,
धेरनगरीची समशेर, श्रांत पणाला
वून कर्तव्याकरतां मागेंच पुढें स-
वली आहे. आतांच्या या फितूर
तिनंतर जबाबदारीचा प्रश्न निकरानें
येतो. दौलतीच्या पायीं वाहिलेली

आपली एकनिष्ठ मस्तकें त्याच दौल-
तीच्या प्रतिष्ठेसाठीं स्वतांच्या तकदी-
रीत तुडवीत कारंजांतील जलतुषा-
रासारखी उडवून लावायला तुम्ही तयार
आहांत ना? राजस्थानच्या या रणो-
त्सवांत त्याच्या भंडारा आपल्या उस-
ळत्या रक्तानें भरायची ज्यांची मर्दा-
असेल त्यांनींच एकलिंगजींच्या पायी
तसा हात मारून आमची खात्री पट-
वावी.

धीर ~~धैर~~ ०:— कुबेरनगरीचा एकनिष्ठ से-
वक राणा धीरसेन एकलिंगजी बरो-
बर दौलतीला जोहार करून आपले
प्राण प्रथम या पणाला लावीत आहे.
(सर्व त्याचेच अनुकरण करून जातात)

सौ०:~~सौ०~~:-(तलवार उपसून) हे विजयसौदामिनी,
तुझ्या सौभाग्यसाठीं आज किती वीरप-
त्न्यांचें सौभाग्य त्रिशंकुसारखें अंतराळें
आहे याची तुला कल्पना आहे कां?
राजस्थानच्या नरसिंहांचे शंईशई खंड
तुकडे तुझ्या एकेक चमकीसाठीं पडतील
पण तुझें विजयवैभव अखंड राहील!...
काय? हंसतेस? शूरसेनांचा पराभव
झाला ह्मणून माझें ह्मणणें तुला खोटें
वाटतें? पण कुबेरनगरीनें राणांजींच्या
सहाय्यावर कांहीं आपली तलवार उपस-
ली नाहीं! शूरसेनांच्या समशेरीच्या
खळखळाट सौदामिनीच्या बांगड्यांत
आहे, हें लवकरच जगाच्या प्रत्य-
याला आणून देईन तरच रजपूत
रक्ताचा तोरा जगभर मिरवीन हीच
माझी प्रतिज्ञा.

झालेल्या या त्यान्च्या पोरानें, ऐन
उमरींत येतांच, मेंदू, मन आणि मन
गट यांच्या जोरावर मोंगली सत्ते
ची हिरवीगार रानशाही करून
टाकली! कौतुकाच्या अभिमन्युल
लाजविणारा हा पराक्रम पाहिला
राजस्थानच्या राशिस्थानाकडे पा
हिलें कीं सगळीं गात्रें हृदयांत स
करून त्यांचें पाणी पाणी होऊन
तें; आणि वाटतें, 'परमेश्वरा, संग्र
थीराज प्रतापसिंहासारखे रणधु
रंधर राजस्थानच्या रासवटींत रि
झवलेस आणि रिचवलेस तरी
कशाला? त्यांच्या उज्ज्वल परंपरेचे
अमृतनांव घेऊन भीष्मप्रतिज्ञा क
रतांना बृहन्नडेच्या वेषांतला किंवा
शिखंडीच्या शेजारांतला पार्थपरा
क्रम तरी आमच्यांत नको कां? पण
लो नाहीं कुठें? तोडरमल्ल, मानसिं
गासारखीं मोहरीं -- नको, त्यांच
विचारसुध्दां आतां नको! मोंगला
विरुध्द समशेर सरसाविणाऱ्या शू
रसेना, तुझा पक्ष धर्माचा आहे असे
जर तुला खरोखरच वाटत असेल
तर शिखंडीपासून श्रीकृष्णापर्यंत
सारें कांहीं तुझें तुलाच झालें पाहि
मग, काय, जयापजयाची पर्वा न
करतां अबूअरवलींत कल्पांत
मांडूं कीं शरीरांतील हाडनी हाड
उपसून शत्रूला मातीला मिळवूं?
असत्या नसत्या क्रूरपणाला असेल
नसेल तेवढा क्रूरपणा दाखवून

झाल्या पराजयाचा शंभरपटीनें सूड
उगवूं कीं न्यायदेवतेच्या निर्बंधांनीं
धर्मयुद्धांचीं पावलें टाकील बलवती
भवितव्यतेकडे लक्ष देऊन मनाचें
शांतवन करूं ! काय, मी करूं तरी
काय ? ---- मना, शूरसेनाच्या मना,
तिरसट अभिमानाच्या वारेमाप भ-
रीला भरून, सूडाच्या पापी कल्प-
नापिशाच्चांना एक क्षणभरही थारा
देऊं नकोस ! धर्म, नीति आणि न्याय
यांनीं चोखाळलेल्या वाटांवरच,
रजपूत शूरसेनाचा आत्मानुभावी
पराक्रम जातीवंत तेजानें फडकला
पाहिजे ! तशा सात्विक जयश्रीनें,
आजच्या अपजयाचें हें माझें काळें
तोंड पुन्हां उजळ होऊन संग्राम-
देवता सौदामिनीच्या पुढें मीजाई-
पर्यंत, तिला संकटकालीं तुझ्या
कृपेच्या हात दे, याशिवाय मी
तरी, भगवान एकलिंगजी, यावे-
ळेस तुजजवळ दुसरें काय मागूं ?

---

स्थळ ] सेनानी समशेर [किल्ल्याचें सिंहद्वार
(बदामीचा पहारा)

दिलदार :- या अल्ला ! या खुदा !
ये खूबसुरत बिजली ! ये बी औरत
लढावू ? परवरदिगार, ऐसा कैसा
हुवा ? (आपल्या लोकांस) भागो, दवडो,
चलो; लेकिन् औरत बिवरत् कुच्च
नाहि मानना भाईओ !
बदामी (तलवार उपसून) :- एक पाऊल
पुढें टाकशील तर या ठिकाणीं,

रक्ताचे पाट या ठिकाणीं वाहूं लाग
तील! (लढतात. मध्येच) धांवा, हो धाव

धीरसेन (प्र०क०):- भिऊं नको, बदामी, भिऊं न
हा धीरसेन झाला गेलेला झाला तर
असला तरी मावळत्या सूर्याच्या स
धारागाइलकी रणगाजी, तुझ्यास
ऱ्या अबलेच्या संरक्षणार्थ अजून
करीत आहे ती पहा! (लढतात)

दिल्लीर:- ये-ये- लाल-लगामवाली बुढ्ढी
घोडी खाटीकखानेकेवास्ते रहनेवा
खवीस है क्या!

सौदामिनी (प्र०क०):- चला, दूर व्हा! मारे जण
एकदम दूर व्हा! पति अन्यायाला बळी
पडल्यावर बेभान झालेली सती नि
राशेच्या निकरानें कशी वीजेसारखी
चमचमते हें या भेकडांना एकदां क
ळून चुकूं द्या! नाहीं! नाहीं! साम्राज
सत्तेच्या शराबपाण्यानें धुंद झालेल्या
या शिळपटांना, कुबेरनगरीच्या, या
सम्राज्ञी सौदामिनीच्या समशेरीचें तेज
पत्याला येऊं द्या! जय एकलिंगजी!
(लढते. दिल्लीर व त्याचे लोक पळून जातात. सौदा
मिनी त्यांच्यावर तुटून जाण्यासाठीं धडपडते; धीरसेन आड
वतो.) सोडा, मामंजी सोडा मला! सौदा
मिनीच्या शरीरांत चैतन्याचा एकही बिं
दु असेल, तोपर्यंत तिला लढूं द्या. रणां
-गणावर देह ठेवणाऱ्या कुबेरनगरींती
दीनदुबळ्यांच्या इमानी रक्तांत सौद
मिनीच्या रक्ताचा पाट पार मिळून
त्याशिवाय तिच्या आत्म्याला शांति
मिळणार नाहीं!

बदामी:- बाईसाहेब, शांत व्हा, शांत व्हा!

धीर०:- बाळ, असा माथेफिरूपणा करूं नको!

सौ०:- माथेफिरूपणा? मामंजी, माथेफिरू-पणा आजपर्यंत काय कमी झाला? कु-बेर नगरीच्या गादीचा अपमान धुऊन काढण्याकरितां, बाप्पा रावळच्या पुण्य-स्मरणानें नित्य आपल्याला धन्य सम-जणारे आणि भगवान् चंद्रमौळीच्या शपथेनें जीवाच्या करारावर लढणारे कडवे रजपूत आजपर्यंत धारातीर्थी-च्याकूं युध्दांतच किती गेले — ऐका, मामंजी, आंतड्यांना पीळ पाडणाऱ्या या दीनदुबळ्या प्रजेच्या आरोळ्या ऐका, आणि सांगा माझ्या हुकमाच्या शब्दा-बरोबर आपले जीव तरवारीच्या धारेवर धरणाऱ्या समशेरबहाद्दरांच्या बरोबरीनें, किंबहुना कांकणभर जास्तच, मी आपल्या शरीरांतला थेंब न् थेंब रणभूमीवर सां-डायला माझ्या समशेरीच्या व तिरंदाजीच्या जोरावर तयार व्हायला नको कां? नाहीं-तर नेत्याच्या चुकारपणामुळें शत्रूसाठीं शिलगावलेला शेकोटा स्वदेशाच्याच स-मूळ नाशाला कारणीभूत व्हायचा! मामं-जी, महाराणी पद्मिनीसारख्या वीरांगनेला साजेलशा बहादुरीनें, कुबेरनगरीच्या स्वाभिमानाला लागलेली आग मला दुष्मनच्या रक्तानें विझवूं द्या! चला —

धीर०:- सूनबाई, प्रसंग लक्षांत घे — जरा सबूर कर. मृत्यु आणि निराशा डोळ्या-समोर थयथयाट घालित असतां तू जाणूनबुजून त्यांच्या जबड्यांत शिरणार! मुली, धीर सो गंभीर! अनुकूल का-ळाची कृपा झाल्यावर आपण काय

वाटेल तें करून दाखवूं. म्हणून म्हणते
सौदामिनी, प्राण धोक्यांत घालण्याच
अविचार करूं नको. सासरेपणाच्या
अभिमान सोडून हा धीरसेन तुझे
पाय धरतो आहे. सौदामिनी, शांत
हो,— शांत हो.

सौ०:— शेळीमेंढीनाच शोभणारा हा भेक
उपणा मेघसिंहांच्याच कुलत्याकडून
होत आहे कां? धीर सो गंभीर म्हणू
अनुकूल कालाची वाट अशुभकाळी
कुंभगुरु करून पहात बसणें, निःश
स्त्र झालेल्या बुद्धिजीवि नेत्यांना
शोभतें; हातीं शस्त्र धरणाऱ्या
सुबुध्द नेत्यांना शोभत नाहीं. श
स्त्राला शस्त्र झडवून झपाट्यासरशी
कायमच्या सोक्षमोक्ष लावून घेतला
नाहीं, तर शस्त्रशोभिवंतांच्य
मृतवत् मानेवर शत्रूची समशेर
सारखी लटकून असते, हें राजकी
नेत्यांनीं तरी ध्यानांत धरायला हवे
जा, मामंजी जा. तुम्हांला तुमच्या
प्राणाची किंमत वाटत असेल त
खुशाल जा, आणि साऱ्या राजस्थान
कडून धिःकार करून घ्या. राष्ट्रानें प्र
तीपर जीवन नेत्यांना आपल्या
जीवाच्या करारावर साधावें लागत
माझ्या नाथांच्या गैरहजरींत ती ने
पणाची जबाबदारी माझ्यावर पडल्य
कारणानें नाथांच्या नांवासाठीं मा
ह्या राजनिष्ठ प्रजेवरून मी आपल
एकच प्राण काय, पण शेकडो जन्मीचे

प्राण आनंदानें उधळायला तयार आहे.
धीर०:- पोकळ आणि अनुभविक विचाराच्या अभावीं नेतेपणाची जबाबदारी उत्साही व तरुण मनावर पडली म्हणजे मुसमुशीनें कित्येक वेळां अविचार घडत असतात.
अविचारी पोरी, अग! ही टीचभर कुबेरनगरी म्हणजे सारा राजस्थान नव्हे. मी माझ्या हातांच्या शरीरांतल्या प्राणांची पर्वा करतों, असा तुला भ्रम असेल, तर ती हातांतील तलवार या माझ्या हृदयावर चालव आणि त्यांतून उडणाऱ्या भडक कारंज्यांत चिंब होऊन मग पुढं पाऊल टाक! सौदामिनी, विचारांत पडूं नकोस, हे पहा, तुझे भाऊ शूरसेनच इकडे आले, त्यांना विचारून पुढलें पाऊल टाक, एवढीच माझी विनंति आहे. तुझ्या शब्दांनीं चवताळलेल्या हृदयाचं शांतवन करण्याकरतां, हाडाच्या रजपुताला साजेल अशा तऱ्हेनें शत्रूचा समाचार घेण्यासाठीं मी निघून जातों. (जातो)
शूरसेन (प्रवेश) :- भगवान एकलिंगजी की जय!
सौ०:- भाऊराया! (थांबून) शूरसेन तुम्ही बोलत कां नाहीं? पराजयानें कां आपलें मन इतकें पिकवटलें आहे? कठिन काळाची दोरी हातीं धरून त्याला आपल्या मर्जीप्रमाणे वाकवूं पहाणाऱ्या जीवांना पराजयाच्या हापटीनें वाढला उत्सा-

प्राण आनंदानें उधळायला तयार आहे.

धीर०:- पोकळ आणि अनुभविक विचाराच्या अभावीं नेतेपणाची जबाबदारी उत्साही व तरुण मनावर पडली म्हणजे मुसमुशीनें कित्येक वेळां अविचार घडत असतात. अविचारी पोरी, अग! ही टीचभर कुबेरनगरी म्हणजे सारा राजस्थान नव्हे. मी माझ्या हाताच्या शरीरांतल्या प्राणांची पर्वा करतों, असा तुला भ्रम असेल, तर ती हातांतील तलवार या माझ्या हृदयावर चालव आणि त्यांतून उडणाऱ्या भडक कारंज्यांत चिंब होऊन मग पुढं पाऊल टाक! सौदामिनी, विचारांत पडूं नकोस, हे पहा, तुझे भाऊ शूरसेनच इकडे आले, त्यांना विचारून पुढलें पाऊल टाक; एवढीच माझी विनंति आहे. तुझ्या शब्दांनीं चवताळलेल्या हृदयाचं शांतवन करण्याकरतां, हाडाच्या रजपुताला साजेल अशा तऱ्हेनें शत्रूचा समाचार घेण्यासाठीं मी निघून जातों. (जातो)

शूरसेन (प्रविश्य):- भगवान एकलिंगजी कीं जय!

सौ०:- भाऊराया! (थांबून) शूरसेन तुम्ही बोलत कां नाहीं? पराजयानें कां आपलें मन इतकें पिळवटलें आहे? कर्दन काळाची शेंडी हातीं धरून त्याला आपल्या मर्जीप्रमाणें वाकवूं पहाणाऱ्या जीवांला पराजयाच्या हापटीनें वाढला उत्सा-

हाची उसळी आली पाहिजे.

शूर०:- अपजयानें खचून नामशेष होण्याइतकें या शूरसेनाचें मन मरतमढें नाहीं! पण ताई, क्षमा कर, माझ्या अपजयानें तुझा विश्वासघात झाला! कुबेरनगरीपर्यंत येऊन मी माघार घेतली — शत्रूला पाठ दाखविली!

सौ०:- भाऊराया, यांत क्षमेचें कांहीं कारण नाहीं! झडणाऱ्या तलवारीलाच मोडण्याभुरडण्याचा प्रसंग येतो. पण हळूं अश्रू आणि निराशा यांसारख्या दुबळ्यांच्या दौलतीवर एक क्षणभरही हक्क न सांगतां, निश्चित ध्येयासाठीं जीवाची कदर न करतां त्याचें मोल देऊन प्रतिज्ञा पुरी करणें कर्तव्यदक्ष वीरांचें वैभव असतें. शूरसेन, निर्वाणीचा निश्चय पाहिजे कीं नामशेष होईन, पण माघार घेणार नाहीं. कुबेरनगरींतील राजनिष्ठ जीवांचा रणयज्ञ मीं केला आहे. त्या जीवांच्या पुण्याईवर मी हें बोलतें आहें.

शूर०:- कुबेरनगरीची ही पुण्याई साऱ्या राजस्थानच्या उध्दाराला कारण होवो! पण ताई, धीरसेन कुठें गेले?

(पडद्यांत:- धीरसेन मोंगलांच्या हातीं सांपडले! एका नराधमानें फितुरी केली! धांवा, धांवा)

अरेरे! काय ऐकतों मी हें! रजपुतांच्या राजस्थाना, तुझ्या पोटची ही असुरी अवलाद केव्हां उलथून पडणार! सौदामिनी, आतां — मेघसिंह आणि धीरसेन हे मोंगलांच्या तावडींत सांपडले असतां — साऱ्या राजस्थान-

ची भवितव्यता तुझ्या भवितव्यतेवर—

सौ०:— नाहीं. या सौदामिनीची भीषण भवितव्यता कदाचित राजस्थानच्या नशिबाला कायमचा खोडा होईल. शूरसेन, ही सौदामिनी मरेल, पण राजस्थानला स्वातंत्र्यवैभव प्राप्त होईल असा आत्मविश्वास मला आला आहे. या सौदामिनीच्या मरणमोलानें जर राजस्थानला स्वातंत्र्य मिळालें नाहीं— तर त्या दुर्दैवाच्या प्रसंगीं पुढच्या मार्ग या माझ्या पतिदेवतेच्या प्रसादाला विचारा.

शूर०:— विक्रमदेवते, तुझ्या पश्चात या रणगाजी समशेरीची उज्वल परंपरा तुझं नांव घेऊन राखणं एवढीच आमची योग्यता! तुझ्या साम्रराण्यांत इतिहासाचीं पानें नी पानें आपल्या आरक्त नांवानें भरून काढणारी ही सेनानीची समशेर तुझ्या कर्तबगार हातीं असतांना, दैव हात जोडून कां उभें राहणार नाहीं? चल, घे एकलिंगजीचें नांव आणि लागूं पुढल्या मार्गाला. (जातात)

स्थळ ] राजदर्शन [दिल्लीरची छावणी

खारिक०:(पडद्यांतून):— खांसाहेब, खांसाहेब, चोर पकडला— येथें आणला.

दिल्लीर०(प्रवे०):— कोण? बंडखोर धीरसेनी कसा सांपडला?

खारिक०:(रक्तबंबाळ धीरसेनास पुढें घेऊनी.) :— कसा सांपडला हें कांहीं सांगतां

यायचं नाहीं; पण हा चोर माझ्या हातीं कसा तरी लागला, आणि मी त्याला खाविंदकदमाशीं हजर केला! बक्षिस-

धीर०:- पाजी निर्लज्जा, कसलें रे बक्षीस! स्वतांच्या पोटाला असे विष्ठेच घालायचे होते, तर या माझ्या लाडक्या राजस्थानांतील प्रत्येक रजपुताच्या तोंडचें एक एक शीत मिळून तुझ्या पुढें अन्नाच्या अरवली कां रे पडला असता! आपल्या भिकार भाग्याची उलटी अंबारी राजस्थानच्या राजरस्त्यावर फिरविल राहिला असतास, तर तुझ्या भीरु हातांतील गंजलेल्या तलवारीला जें सोनेंवैभवाचें तकदीर स्वप्नस्वप्नांतरी लाभणें शक्य नाहीं, तें तुझ्या सडलेल्या अंतःकरणाच्या समाधानासाठीं सहजासहजीं लाभलें असतें! राष्ट्रमातेच्या पदराला हात घालणाऱ्या सैताना, देशबांधवांच्या विश्वासघात करणारें तुझें बदमाष अंतःकरण कोणत्या नरकाच्या आशेनें असें माजगमनी बनलें? बदाभीसारख्या तेजस्वी व राजनिष्ठ स्त्रीचा तू नवरा म्हणून तुझ्या हातीं मी विश्वासानें मान दिली त्याचवेळीं ती मुरगळून, ~~माझ्या रक्ताची आपली तहान थांबविण्याकरतां~~, आपल्या दगलबाज हातांना श्रम कां दिले नाहींस? तुझीं पापी आंतडीं जिवंतपणीं तोडून काढून तुझ्यावर रौरवांतलीं गिधाडें सोडूं, अस्मानच्या बिजलीनें तुझें अंतःकरण एकदम फोडून काढून त्याच्या चिंधड्या उडवूं, कीं काय, करूं काय?

दिल्ली०:- आपण कांहीं एक करूं नका! आणि असल्या गोष्टी फिरून बोलूं नका. कैद्यांचें तें काम नव्हे, त्यांनीं तें मनांतही आणूं नये. राजघराण्या-च्या चोंचल्यामुळें आजपर्यंत तें आपल्याला माहीत नसलें, तरी आतां एकदम आपल्या रक्ताचा फवारा ——

धीर०:- त्या फवाऱ्यांत चक्कर कर-णाऱ्या प्रत्येक रक्तबिंदूंत या धीर-सेनाची संतापानें पेटलेली क्रूर मूर्ति दिसेल! मी एक या ठिकाणीं मरून पडेन, पण माझ्या हेतूच्या पूर्ततेसाठीं या रजपूत पिशाच्चाच्या कृष्णकृ-त्याचा डंका दुनियेंत इथून तिथून गाजविण्याकरतां माझ्या रक्ताचा प्र-त्येक थेंब रणबहादूर रजपूत म्हणून खडखंब राहील!

दिल्ली०:- चूप बंडखोर!

धीर०:- काय बंडखोर?

खावि०:- खाविंदांना उलटून प्रश्न वि-चारतो आहे अन् काय! बंडखोरच!

धीर०:- बादशाहातर्फेंच त्याच्या अधि-काऱ्याशीं अप्रतिहत राजनिष्ठेनें वा-गणाऱ्या, स्वाभिमानशून्य गुलामगि-रींतील जिवंत प्रेतांनो, न्यायानें न्या-याचा काटा काढण्याचा हा खुनी न्याय कायमचा आपल्या मनावर कोरून ठेवा.

दिल्ली०:- चूप, राजद्रोही खुनी —

धीर०:- कोण खुनी? निष्पाप रक्ता-चा ज्याच्या हाताला चुकून स्पर्शसु-द्धां नाहीं तो हा धीरसेन खुनी? कीं

म्हणायला जगाचे डोळे फुटले पाहि-
जेत! या धीरसेनाच्या या लाड्या
जखमेला पाहून प्रत्यक्ष खुन्याला-
ही खून दिसणार नाहीं.

दिल्ली०:- फाजील बडबड एकदम बंद कर.
जवान, या बदमाष बंडखोराला ह-
त्तीच्या पायीं द्या. धीरसेन, बंडखोर-

धीर०:- हें बंड नाहीं! हातीं आलेल्या प-
साभर सत्तेच्या जोरावर, न्यायी स-
म्राटसत्तेच्या तेजोमय सूर्याला खग्रास
ग्रहण लावणाऱ्या पापी केतूवर ही मो-
हिम होती!

दिल्ली०:- आम्हांला तसें दिसत नाहीं.

धीर०:- तर हा मी एका पायावर तयार
आहें. खानसाहेब, दिव्यमृत्यूचें भय
फक्त कनिष्टांना असतें! माझ्या
लाडक्या पुण्यपावन देशा, याजन्मीं
नाहीं, तरी स्वर्गांतून तरी तुझ्या डोक्या-
वर न्यायाचा दिव्य मुकुट पडलेला
मला पाहूं दे! खरोखर आज हा धी-
रसेन हत्तीच्या पायीं जात नाहीं तर
राजस्थानची न्यायदेवता माझ्या रू-
पानें हत्तीच्या पायीं जात आहे!

दिल्ली०:- चलो, जवान, न्या म्हणतों ना यांना!

अकबर (पडद्यांतून):- खामोष! अल्ला की कसम!
राणाजी धीरसेनांला हत्तीच्या पायीं
देऊं नका.

दिल्ली०:- हा कोण उपटसुंभ आहे रे!

अक०(प्रवेशून) मी राणीसरकारचा खीमआहे.

दिल्ली०:- जवान, उसकू बी पकडो!

अक०:- दिल्लेर, तू आपल्याला कोण समजतोस

५४

राणाजींना हत्तीच्या पायीं देण्याचा तुला रे काय अधिकार!

दिल्ली०:— तू कोण विचारणार!

अक० (हकीमाचा वेष काढून) :— बोल, मला विचारण्याचा अधिकार आहे कीं नाहीं!

दिल्ली०:— या अल्ला! परवरदिगार! ये तो खुद खाविंद!!

अक०:— दिल्लीर चल, राणाजींना छावणीकडे सन्मानानें घेऊन चल! धीरसिंगजी, आपल्या राजनिष्ठेचा आपल्या लोकांकडून असा उपमर्द झाला— होत आला याबद्दल आपलं रजपूत अंतःकरण मला क्षमा करील कां!

धीर०:— खाविंद, आपल्याला मी कसे धन्यवाद देऊं! आपल्याकडून कुबेरनगरीला खात्रीनें न्याय मिळेल असें वाटूं लागलें आहे. चला, खाविंद, सगळ्या गोष्टी छावणींतच आपल्या चरणीं सादर करतों.

---

स्थळ] चेतावणी [रणांगणाच्या धर्ती

शूर०:— शूरवीर सैनिक हो, आजची लढाई या शूरसेनाच्या ऐतिहासिक कीर्तिकरतां नाहीं, चितोडच्या गेलेल्या सत्तेच्या पुनर्जीवनाकरतांही नाहीं; तर रजपुतांचा मोडलेला विजयध्वज पुन्हां दिमाखानें आकाशांत उंच फडकावा म्हणून आहे. कालच्या फत्तेपूरच्या विजयानें आपल्याला शुभ शकुन केला आहे. तेव्हां अगोदर राणा संगांचा जयजयकार

अगोदर उच्च स्वरांत करा.

सर्व :- राणाजी संगांचा जयजयकार असो.

शूर० :- लक्षांत ठेवा, राणाजी संगांचें किंवा बाप्पा रावळांचें मंगल नांव घेऊन जय-जयकार करण्याचा अधिकार वैभवलो-लुपांचा नसतो. दोस्त हो, जरा बेमुर्वती-नें बोलतों — माफ करा. पण हाभऱ्या पराजयानंतर जरा जय झाला तर मानवी मन निलाजरेपणानें सुखसो-हाळ्यांत रंगून जाण्याचा संभव असतो तसें तुम्ही कराल तर राष्ट्रदेवतेचे अपराधी व्हाल. दारापुढें शत्रू उभा असतांना, फत्तेपुरच्या छोट्या विज-यानें हुरळून जाल तर स्वातंत्र्याकरतां उसळणाऱ्या पूर्वीच्या तुमच्या ऊर्मी कशा मरून पडल्या असा रोखठोक सवाल राजस्थानचा खडा न् खडा विचारील. शत्रुसेनेची ठोकर डोक्यावर बसून सिं-हासनासकट स्वराज्य गमवून बसले-ल्या माझ्या जिगरदोस्तांनो, या अधः पातांत उतावीळपणा न करतां, आत्म तेजाच्या जोरावर राजलक्ष्मी परत फिरवण्याकरतां कंबर कसण्याची ज्यांची तयारी असेल त्यांनाच राणा-जी संगांचा जयजयकार करण्याचा अधिकार आहे, हें लक्षांत ठेवा.

सै० :- महाराज!

शू० :- मी महाराज नाहीं; राष्ट्र हें एकच आपणा सर्वांचा महाराज आहे.

एक सै० :- त्याची जागती जाणीव महाराज, आपल्या रूपानें आमच्यापुढें सारखी तेवत असतां, आम्ही तें कसें विसरूं?

शूर०:— मग आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्याचे दिवस यायला फार दिवस नकोत. आपल्या पक्षाची सरसेनानी सौदामिनी आज दोन दिवस काय हालचाली करीत आहे याची खबर, प्रथम फत्तेपूरच्या तर्फेनें काढली पाहिजे. कारण, आपल्या विजयाला गादीची विशेष जरूर नसून या स्वातंत्र्ययुध्दांत सौदामिनी सामील झाल्याबद्दल तें पारितोषक तिलाच मिळालें पाहिजे. स्वातंत्र्याचें स्वयंभू तेज राष्ट्रांतील व्यक्तिव्यक्तीच्या तोंडावर तळपूं लागल्यावर त्या तेजापुढें साम्राज्यसिंहासनांचीं रत्नमय तेजें अवसेच्या अंधारासारखींच नाहींत कां! म्हणून स्वातंत्र्याच्या स्वर्गीय सुखचैतन्यानें प्रत्येक व्यक्ति महिरून गेली म्हणजे —

सर्व:— सरकार, आपलें ध्येय आम्हांला सर्वस्वी मान्य आहे.

शूर०:— अशा आणीबाणीच्या प्रसंगीं राजस्थानचें गळतें स्वराज्यतोरण जर आपल्या गाफीलपणानें एकदम गळून पडलें तर स्वातंत्र्याकरितां आपल्या सौभाग्याच्या होळ्या करणाऱ्या साध्वींचे शिव्याशाप आपल्याच मस्तकावर कोसळतील हें लक्षांत ठेवा.

ए.सै०:— सरकार, आमचें आगें झालेलें तेज यापुढें यत्किंचितही मंद होणार नाहीं.

शूर०:- मग माझी काळजी अजी गेली! खरें आर्यतेज जागें झाल्यावर कर्तव्याची जाणीव त्याला आपोआप होत असते. तर मग राजस्थानच्या शूरवीर बच्चांनो, सेनानी सौदामिनीच्या — राजस्थानच्या त्या अंबिकेच्या निशाणाखालीं शत्रूवर मरूं किंवा मारूं या वज्रनिश्चयानें तुटून पडण्यासाठीं तिचा मार्ग चोखाळत, भगवान् एकलिंगजीला स्मरून आपले रिसाले हलवा, मी तुमच्या आघाडीला हनुमान वेगानें तयार आहें. (भगवान् एकलिंगजीचा जयजयकार करून लष्करी शिस्तीनें सर्व सैनिक जातात.) घटकेघटकेला मला नवजीवन देणाऱ्या माझ्या लाडक्या राजस्थाना, तुझें पितृऋण मी कसें फेडूं? या जीवाची ज्योत करून तुझी पंचारती करूं कीं माझ्या उसळत्या रक्ताचा तुला अभिषेक करूं? देशाच्या मंगलासाठीं स्वतांचें अमंगल करून घेणाऱ्या शक्तींनो, तुमच्या पावन पावलांना साक्षी ठेवून हा शूरसेन प्रतिज्ञा करीत आहे कीं राजस्थानला स्वतंत्र करण्याकरतां, मी या क्षणीं फकीर झालों, आणि माझ्या ध्येयासाठीं या साडेतीन हात देहाचे तुकडे तुकडे करून घ्यायला मी तयार आहे. स्वातंत्र्य! शूरसेना, स्वातंत्र्य हेंच तुझें जीवन, स्वातंत्र्य हाच तुझा देह आणि स्वातंत्र्य हाच तुझा देव!

# निर्वाणीची तयारी

( एका बाजूनें खारीकसिंग व दुसऱ्या बाजूनें बेदाणी जाऊं लागतात. त्यांचा एकमेकांना धक्का लागतो )

बे०:– अग बाई ग! कोण रे मेल्या तूं ? डोळे फुटले कां किटले कां कायमचेच मिटले ?

खा०:– अजून स्व रा ज्या ची आशा आहे, म्हणून बायकांचा हा चढेलपणा आहे. काय ग ए, मला असं एकदम बोलायला, तुझ्यापेक्षां या जगांत काढलेले चार पावसाळे कुठं गेलेच वाटतं ? परराज्यासारखं सुख नाहीं, असं मी नेहमीं म्हणत असतों तें उगीच नाहीं ! वयाच्या वडीलकीवर सुद्धां अपमानाला पायांखालीं चेचतां येते !

बे०:– हातांतील शस्त्र परक्यांच्या हुकमतींत असल्या कारणानं नुसत्या मिशा पिळण्यानंच एरवीं पुरुषार्थ गाजवितां येतो ! !

खा०:– ही बादामीच ! शंका कशाला ? खारीकसिंगा, सांभाळ आपली गर्दन.

बे०:– माझ्यासारख्या बायकोला धक्का–

खा०:– मी ऽ आंधळा आहे ! !

बे०:– मेल्या, माझ्या तोंडावर हा पडदा आहे म्हणून ! नाहीं तर तुला ओळखून तुझी चमडीच लोळविली असती.

खा०:– आमचा तोफखानाच हा ! त्याशिवाय इतका झपाटा नाहीं यायचा. आपल्या मुसलमान बादशाही स्त्रियांचे तुम्ही पडदानशील अनुकरण केलंत हें प्रगतीचं लक्षण आहे. पण काय हो, तुमचं हें असं व्हायला कारण काय ?– नाहीं, मला आंधळा व्हायला कारण आहे म्हणून विचारतों.

बे०:– कोणतें ?

खा०:– मी एका खविशिणीला भितों आहे. ती आतां या देवडीवर असेल. तेव्हां तिची नजरभेटसुद्धां व्हायला नको म्हणून मी अस्सा आंधळा झालों आहे.

बे०:– म्हणजे तुम्ही कोण ? खारिकसिंग की दुसरा एखादा फटींग ? नाहीं, बायकोला भिणारा खारीकसिंगासारखा दुसरा राजपुत्र या राजसंस्थानांत नाहीं, म्हणून मी विचारतें.

खा०:– वा ! तुम्हींहि बाकीच्या सगळ्या माणसासारख्याच मुर्ख दिसता. मी बायकोला भीत नसून स्त्रीदाक्षिण्यानें तिच्याकडे नेहमीं डोळेझांक करतों.

बे०:– बायकोकडे डोळेझांक ? मग, तुम्हीं या बेदाणीचे खारिकसिंगच.

खा०:– कोण ? मेरी प्यारी बेदाणी ! ( तिच्या तोंडावरील बुरखा दूर करून ) खरंच, तू बेदाणी ग बेदाणी.

बे०:– अन् तुम्ही पण माझ्या जीवाचे खारिकसिंगच–

बदामी ( प्रवेशून )०:– कोण, कोण आहे ते ?

खा०:- अरे बापरे ! आतां कसं ग ? तुझा चेहरा पाहिल्याबरोबर, बेदाणी, मी लग्न लावून घेण्याच्या विचारांत होतों. भग एखाद्या मशिदींत जाऊन बादशाही पद्धतीनें निकालावण्याचा माझा विचार होता. पण आतां नक्की लग्न–घ टकेएवजीं आपलीच घटका भरावयाची पाळी आलीय.

बे०:– मग, आतां पळ काढतां कां ? आपल्या सारख्या कडव्या रजपूत जातीनं हें उदाहरण घालून दिलं म्हणजे इतिहासाला नवें वळण लागेल !

खा०:— सगळं खरं ! पण पळून जायची देखील भ्रांत आहे ग ! या बदामीचा आवाज जरी ऐकला तर सुद्धां माझे पाय भेंडाळतात. अन् आतां तर काय, पळायला लागलों तरी तिची मूर्ति डोळ्यांपुढून हालण्याची सोय नाहीं.

ब०:– काय हो, आपापसांत काय कुजबुजताय ? विचारल्या प्रश्नाचें उत्तर नाहीं कां द्यायचें ? ( पुढें होऊन ) कोण ? इकडं ?

खा०:– होय, तू तिकडंच हो. पण काय ग ! रणांगणावर जाऊन अजून तू मेली कशी नाहींस ?

ब०:– मी तर आज मरणारच आहे. मोंगलाईशीं सुरूं केलेल्या लढाईचा आजचा निकराचा दिवस आहे. पण काय ग बेदाणी तू या मूर्तिमन्त विघ्नाशीं कां लग्न लावणार आहेस ?

खा०:– या ज्वालामुखीचं तोंड लिंपायला हिमालयाचा बोळा घालूं कां ब्रम्हांडाचा गोळा करून घालूं ?

ब०:– कांहींएक खटाटोप करूं नका. कसे झालांत तरी तुम्ही माझे पति आहांत तेव्हां राहवत नाहीं म्हणून तुमच्या कल्याणाची गोष्ट सांगते.

खा०:– ज्या दिवशीं आपण माझ्या गळ्यांत पडलांत त्याच दिवशीं आमचें कोटकल्याण झालं.

ब०:– पण मला आणखीन करायचंय. बेदाणी, इकडं ये अन् तुझा हात माझ्या हातीं दे.

बे०:– अशी हातोहात लांबवून मला तू करणार तरी काय ?

ब०:– तुझ्या मनचेंच. अग, अशी भितेस काय ? ( बेदाणीचा हात धरून ) ऐकलं कां, आपलाहि हात जरा—

हो, तुमचें हें असें व्हायला कारण

खा०:- चुकूनसुद्धां मिळणार नाहीं. आजच्या लढाईत तू मरायला निघालीस, तिथें आम्हांला बळी द्यायला नेतेस होय? अग, आम्हांला जगूं दे. तुमचा जय झाला आणि तूं जिवंत आलीस किंवा मरून पडलीस तरी तुझ्यासारख्या वीरेचे सौभाग्य म्हणून मला मिरवतां येईल. अकबर बादशहाचाच जय झाला, तर बेदाणीला नी मला मानसिंगासारखे मानांनें मिरवायला सांपडून तुझ्या जिवंत डोळ्यावर कातडें ओढण्यासाठीं आतांच्यासारखे सुताडे गोताडे करण्याचें कारण पडणार नाहीं. काय!

बेदाणी:- अन् दोन्ही पक्षाचा दोस्तीचा तह झाला तर!

खारीकसिंग:-- आपली दोस्ती जमीन दोस्त झालीच म्हणून समज- ( थांबून ) मी आतां जास्त बोलत नाहीं. नाहींतर जमीन दोस्तीचा प्रसंग आतांच यायचा.

बदामी:-- तो केव्हांच यायला नको. दशरथाला कैकयी, अर्जुनाला शिखण्डी, सर्व साधारण वीराला ढाल जशी स्वसंरक्षणाला उपयोगी पडते तशी आपल्याला बेदाणी सारखी बायको नेहमी उपयोगी पडावी म्हणूनच माझी योजना--

खारीकसिंग:-- काय, म्हणतेस काय बदामी तू! मला नाहीं. खरे वाटत -वहा, माझ्या गळ्याचीं, पण छे फुकट मरायला मी नाहीं तयार! सौन्दामिनीसाहेबाची शपथ वहा.

बदामी.- सौंदामिनी साहेबां शपथ माझ्या बोलण्यांत एकही अक्षर खोटं नाहीं. भरलेल्या सौभाग्यांत मी धारातिर्थी जात असतांना उगीच खोटं कशाला बोलू?

खारीकसिंग:-कालोमाता कीं जय! भगवान एक लिंगजीं की जय? ( बदामीच्या हातीं आपला हात देतो )

बदामी:- ( बेदाणी खारीकसिंगाचे हात जुळवून देते )

खारीकसिंग:- शुभमंगलऽऽसाऽवधान. याला म्हणतात बायको.

बेदाणी:-बदामीबाई तुम्ही किती पण गोड आहांत

बदामी:-मी नेहमीच आहे. कुणाचं अकल्याण करायचं माझ्या नांवरस नांवाला सुद्धां माहीत नाहीं. पण आज मरणाच्या दारांत उभी असतांना मी आपला गोडपणा कशाला सोडू! नाथ, मी आज पर्यन्त आपल्याला छळलं--मी नाहीं म्हणत नाहीं पण पतीच्या दगडाचा देव बनविण्याकरतां पत्नीनें बेमुर्वतपणाची टाकी अवश्य घेतलीं पाहिजे, त्या भावनेंनें छळले, नाथ त्याची मला क्षमा करा.

खारीकसिंग:- यावेळेस तुला कोट खून माफ आहेत.

बदामी:- बाईसाहेबाबरोबर मला आज लढाईला गेलंच पाहिजे.-

खारीकसिंग:- म्हणूनच सांगतों इकडची काळजी बिलकूल करूं नकोस. भगवान एक लिंगजी तुझ्या डोक्यावर रणमोक्षाचा वरद हस्त कायमचा ठेवो:?!

खा०:- कोण? तू [illegible] ति आणि जीव धारण करून ऽया जीवाच्या आशेनें ही धुमश्चक्री चालविली, किंवा पुढें जिवंत राहून उसळल्या उत्साहानें फिरून चालवायची तो माझ्या सौभाग्यस्वातंत्र्याच्या जीव मला आजच्यासारख्या पारखा रहावा आणि कुबेरनगरीच्येंच काय पण अखिल राजस्थानच्चें स्वातंत्र्य रजपूत डोळ्यांना पुन्हां दिसूच नये, असाच जर निष्ठुर नियतीचा न्याय असेल, तर पतिसेवेच्चें आणि देशसेवेच्चें खडतर कर्तव्य बजावित असतांनाच, अपरिहार्य मृत्यूनें धारातीर्थी माझा बळी ~~बेतला~~ घ्यावा; ~~वर~~ जीवींच्या आशांसकट सौभाग्यस्वातं

स्थळ ) राजधोरण ( रणांगण

(पडद्यांतः– पळा! बाईसाहेब, धांवा! जीव वाचवा! पळा! धांवा! जीव वाचवा!)

सौदामिनीः– पळूं? धांवूं? जीव वाचवूं? पळून कुठें जायचें? धावून आसरा कुठें शोधायचा? जीव वांचवून पुढें काय करायचें? रजपुतांचा रणप्रवेश म्हणजे बोलून चालून मृत्यूच्या दाढेंतील मानाशिरकावणी! मग तो मृत्यू दांतओठ करकरूं लागला म्हणून पळून जीव वांचवतां येईल! आणि जीव धारण करून ह्या जीवाच्या आशेनें ही धुमश्चक्री चालविली, किंवा पुढें जिवंत राहून उसळल्या उत्साहानें फिरून चालवायची तो माझ्या सौभाग्यस्वातंत्र्याचा जीव मला आजच्यासारखाच पारखा व्हावा आणि कुबेरनगरीचेंच काय पण अखिल राजस्थानचें स्वातंत्र्य रजपूत डोळ्यांना पुन्हा दिसूंच नये, असाच जर निष्ठुर नियतीचा न्याय असेल, तर पतिसेवेचें आणि देशसेवेचें खडतर कर्तव्य बजावित असतांनाच, अपरिहार्य मृत्यूनें धारातीर्थी माझा बळी ~~घेतला~~ घ्यावा; ~~वर~~ जीवींच्या आशांसकट सौभाग्यस्वातं-

त्यानिशीं धुळीला मिळण्यापेक्षां की-
र्तिमंत पराक्रमाची खडेखुपस वि-
जयी शत्रूच्या डोळ्यांत ~~वे~~ निरंतर-
ची खुपत ठेवावी; आणि रजपुतां-
पेक्षां परक्या रियासतींचा राजस्था-
नाविषयक इतिहास लिहिणाऱ्याले
खकाची लेखणी रजपुतांचे पराक्रम
डोळ्यापुढें [illegible]नेसाठीं उभे राहतांच
जिथल्या तिथें अडखळून पडून नेत्रीं-
च्या अश्रूंनीं लिहिला मजकूर धुत-
ला जावा; — सौदामिनी, येत्या
काळाला हें नवें वळण लावण्यासारखा
तरी पराक्रम गाजवून तू मरायला
नकोस कां! (शस्त्र उपसले, शत्रूचे
लोक येतात) या, एक या, लाख या!
जहरी जीवाच्या निशाबाज नजरेंत
नसेल इतका जलालपणा प्रयत्नांतीं
निराश झालेल्या तडफदार जीवाच्या
निर्वाणीच्या बेगुमानींत असतो. (लढ-
तात. सर्वांना सौदामिनी पिटाळून लावते)
संपला, या महामानी सौदामिनीचा
अवतार आतां संपलाच म्हणायचा!
मांडीखालची घोडी गेली, हातांतलें
विजयनिशाण नाहींसें झालें, सगळ्या
सैन्यापासून वेगळें सरून एकाकी ल-
ढतां लढतां आतां या शत्रूच्या टोळीचा
पराभव केला, पण माझ्या एकाकीपणाची
बातमी शत्रूला लागून ते टोळधाडीनें
आतां तुटून पडतील! एका शूरसे-
नांची थोडीशी आशा — पण छे!
तरवारीच्या धारेवर मान ठेवणाऱ्या
जीवांनीं अनिश्चित आशापूर्तिवर

विसंबून राहण्यांत कसला अर्थ!
पण, म्हणून पळ? छे! ती कल्पनासु-
ध्दां आतां सौदामिनीच्या स्वाभिमा-
नाला जाळल सुटले! भगवति भवि-
तव्यते, तुझ्या असतील नसतील
त्या शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज होऊन
माझ्याशीं सामना कर, मी आतां
शेवटपर्यंत तुला तोंड देणार आहे.

बदामी (प्रवेशून):- सरकार, हें ठिकाण सु-
रक्षित नाहीं! कुठेंतरी चला!!

सौ०:- म्हणतेस काय? मी रणांगणांतून
पळ काढूं? बदामी, काय सांगतेस हें!

ब०:- सरकार! घात!! ते पहा शत्रूने लोक
जवळ येत चालले — येथें येऊन भिडले

सौ०:- तर मग माझ्या रणजोहराचीच वेळ
जवळ आली! विश्वास धरण्यालायक
देशबांधवांनींच दगा दिल्यामुळें बलिष्ठ
बनलेली भवितव्यता प्रभावशाली कीं
जीवाची तमा न धरणाऱ्या निश्चयाच्या
समशेरीवरचा नाच रणगाजी याचा
निकाल आतां इथेंच लागला पाहिजे.
(लढतात. इतक्यांत शूरसेन येतो) शूरसेन,
किती वेळेवर देवानें तुम्हांला धाडलें! र-
णांगणावर रजपूत रक्त रक्ताराक्ता-
गणिक सांडून राजस्थानची, कुबेर-
नगरीची आणि माझ्या पतिदेवतेची
सेवा करताकरतांच भगवान एकलिं-
गजीची हांक मला मारतो आहेसें
दिसतें! तेव्हां, भाऊराया, कुबेरनग-
रीच्या मालकांची सुटका करण्याचें
वचन तुझ्या लाडक्या ताईला देतोस
कां?

(दीन! दीन!! करणाऱ्या शत्रुसेनेला पिटाळून)

शूरसेनः- भगवान् एकलिंगजी काय पाहतों हें मी? राजस्थानच्या रणमर्द इतिहासांत नखशिखांत जखमरत्नांनीं नाहिलेली रमणी, सौदामिनीताई दुसरी सांपडणार नाहीं. मागें महंमदघोरीशीं शेवटच्या घनघोर सामना करतांना पृथ्वीराज चव्हाण किंवा देवी संयोगिता देखील अशीं रक्तबंबाळ झालीं नसतील! ताई, सौदामिनीताई, काय तुझी ही दशा? ही दशा, धीरसेनांच्या हातच्या सुभेदारांचा लखोटा लांबवून मी आणली!

सौ०:- शूरसेन आतां रडतां कां? रडण्याची कां ही वेळ आहे? राजस्थानच्या स्वयंभू स्वातंत्र्यासाठीं माझें सहाय्य मिळावें म्हणून तुम्ही करीत असलेल्या खटपटींत त्या लखोट्याच्या लटपटीची तुम्हांला बिनमोल मदत झाली असली, तरी त्या लखोट्यानेंच माझा स्वाभिमान जागृत केला आणि रणबहादुरीनें सती संयोगितेचें नांव सांगण्याची योग्यता प्राप्त करून दिली! शूरसेन, मग तुमच्या डोळ्यांत पाणी कां? आपले परस्परांचे हेतु कसे असोत, चालू संग्रामांत हजारो जीव आजपर्यंत रणदेवतेला बळी गेले! त्याबद्दल तुमच्या डोळ्यांत पाणी येणार! का तुमच्या मतानं जन्मसिध्द असलेल्या स्वातंत्र्याच्या हक्काला मुकून मातीत तोंडें खुपसून बसण्याचा प्रसंग क-

दाखिल आतां येणार म्हणून अश्रु ढाळ-
णार? नेता भेटेल तशी कर्तबगारी
करण्याऱ्या आपल्या लोकांचा स्वभाव
ओळखून आविंधांनीं कुळाला व मला
आपआपल्या सैन्यापासून फोडल्यावर,
शूरसेन, अशी वेळ आली असतां
माझी विनंती बाजूला ठेवून ——

शूर०:— रणदेवते, राणाजी मेघसिंहांना
सोडवून आणून राजस्थानचें स्वा-
तंत्र्य कायम ठेवीन — तरच स्वतांला
शूरसेन म्हणवीन.

सौ०:— तो भाग्याचा क्षण पाहीपर्यंत मी
जिवंत राहिलें तर वज्रदेहानें पुन्हां
कुबेरनगरीची सेवा करीन.

ब०:— बाईसाहेब, तुमच्या या जखमा जि-
व्हारीच्या आहेत.

अकबर (धीरसिंह व मेघसिंह यांसह प्रवेश करून)
:— राणीसरकार, आपल्या जखमांवर
हें पहा मीं एक वस्ताद औषध आणलें
आहे. आतां होईल ना आपला रोग बरा!
(थांबून) राणीसाहेब आपण या हकीमा-
ला ओळखलें कां?

मेघसिंह:— लाडके सौदामिनी, गांजलेल्यांचा
कनवाळू, न्यायाचा पुरस्कर्ता, हिंदु-
मुसलमानांच्या एकजीव दिलजमाई-
साठीं तळमळणारा सम्राट अकबर
बादशहा तो हाच.

धीरसेन:— खाविंद, आपलें सत्यस्वरूप सौदा-
मिनीला दाखवा. (अकबर तसें करतो)

सौदा०:— खाविंद, हकीमाविद्येनें आपण मला
माझ्या रोगावर कबूल केल्या प्रमाणें
अचूक औषध दिलें त यावदु [illegible]

कुलक्ष राजनिष्ठेचें वतन मी आपल्याला कायम बहाल करतें. (शूरसेन गरगर डोळे फिरवितो)
पण खाविंद, आपल्यासारखा सद्गुणाचा पुतळा दिल्लीच्या तक्तावर असतांना, कुबेरनगरीवर एवढा अन्याय कां बरें व्हावा?

अक०:- दिल्लीर चलये आणि राणीसाहेबांपुढें नाक घास. (दिल्लीर तसें करतो) राणीसाहेब, दिल्लीच्या सम्राट-तक्ताचा मालक म्हणजे त्यानें नेमलेले अधिकारी नव्हेत! तक्ताची आज्ञा मानायची सोडून अधिकाऱ्यांनीं आपलीच अरेरावी गाजवायला सुरवात केली म्हणजे, झाले असे अन्याय व्हायचेच! पण त्यांची जाणीव झाल्याबरोबर बादशहानें त्याचें निराकरण केलेंच पाहिजे; तें त्याचें कर्तव्यच आहे. आणि म्हणूनच हकीमाच्या गुप्तवेशानं हिंडून मला हा खेळ खेळावा लागला! राणीसाहेब, आमच्या अधिकाऱ्यांच्या बेगुमान सुलतानीबरोबर (खारीकसिंगाला पुढें ओढून) तुमच्या लोकांची फितुरीही एवढ्या अनर्थाला कारण झाली!

शूर०:- मेघासिंहजी, धीरासिंहाना शत्रूच्या स्वाधीन करणाऱ्या या खारीकसिंगाला हत्तीच्या पायीं द्या, आणि बेदाणीला तीच वाट दाखवा! सगळा राजस्थान धर्मसंग्रामांत पडला असतांना, त्याच्या आगीवर स्वतांचीं पोटें भाजणाऱ्या आणि त-

ग्नाचे होम करणाऱ्या या बेवकूब पैदाशीला राजस्थानांतून नाहीसेंच केलें पाहिजे. नामर्दपणा हें रजपुतांचें ब्रीद नव्हे. बदामी, तुझ्यावर यापुढें येणाऱ्या प्रसंगाबद्दल माझ्या हृदयाला पीळ पडलो! पण, कोणत्या रजपूत स्त्रीला नामर्द पति आवडेल ?

बद०:- राणाजी !

धीर०:- शूरसेन, असें डोक्यांत राख घालून कसें चालेल! सौदामिनीच्या शेजारी उभी राहून रणांगणावर बदामी लढली, त्याचें तिला हेंच कां बक्षीस ! खारिकासिंगासारखेही आतां अनुभवानें शहाणे होतील! शिवाय, आपल्या लोकांना आपण ताळ्यावर आणायला नको कां ?

शूर०:- (स्व०) अकबर बादशहाच्या मिठास सारवरपेरणीला भुलणाऱ्या मुंगळ्यांनो पारतंत्र्याच्या वरवंट्याखालीं तुम्ही चिरडूनच निघणार असला, तर या शूरसेनाच्या शब्दपांडित्याचा कोणता उपयोग होणार ?

अक०:- धीरसेन, राणाजी, राणीसाहेब, आपण सगळ्यांनाच माफी करून सोडून देऊं या! या साऱ्या अनर्थाला कारण असणाऱ्या सत्तालोलुप सुभेदाराला आपणां सर्वांच्या देखत जाहीर जरेनें हत्तीच्या पायीं देण्याचें ठरविलेलें जाहीर आहेच. तें योग्य वेळीं अमलांतही येईल! पण दिल्लीर, सुभेदाराची आज्ञा म्हणून तू हा खेळ खेळलास खरा पण आतां लक्षांत ठेव — हिंदूंना

बंधु मानल्याशिवाय मुसलमानांना
हिंदुस्थानांत कायम राहतां येणें
शक्य नाहीं. आमच्या आजोबांच्या-
बाबर बादशहांच्या पूर्वींचे मुसलमान राजे येथें
केवळ लुटीकरतां येत होते; पण आ-
म्ही मोंगल हिंदुस्थान आपला देश
समजून या ठिकाणीं रहात आहोंत!
आणि म्हणूनच हिंदू व हिंदूंचा धर्म
यांना मुसलमान व इस्लामी धर्म
यांच्या इतकाच मान दिल्याशिवाय
दिल्लीच्या तख्तास बळकटी यायचीनाहीं.
राणाजी, हिंदुमुसलमानांच्या एकीतच
आपणां सर्वांचें कल्याण आहे. झालेला
सर्व प्रकार रजपूत हृदयाच्या उदारपणानें
विसरून आपण एकदिलानें पूर्वींची आ-
पली नाती कायम ठेवावयास तयार आहांत ना?
शूर० शिवाय सर्वः- खाविंद, आहोंत, आ-
नंदानें तयार आहोंत.
शूर०:- पण मी तयार नाहीं. अकबर
बादशहाचें साम्राज्य सुखाचें व न्यायाचें
होईल कदाचित्! परंतु सुखाच्या
पारतंत्र्यापेक्षां दुःखमय स्वातंत्र्यच
माझ्या रजपूत रक्ताला जास्त मानवेल.
राजस्थाना, माझे शब्द आज ना उद्यां
तरी तुला पटतील कां! (एकदम जातो)
अक०:- उतावीळपणानें डोक्यांत राख
घालून निघून गेलेल्या शूरसेनाला
तुमच्याप्रमाणेंच मोंगल साम्राज्याचा
जानी दोस्त करीन तरच नांवाचा अकबर--
मेघ०:- बोला तर हिंदुमुसलमानकी जय!

---

समाप्त.